सर्वधर्मसमभाव आणि इस्लाम धर्म

– लेखक –

मुहम्मद फारुक खान
मुहम्मद जैनुल आबिदीन
डॉ. सयद शहिद अली
मुहम्मद इकबाल मुल्ला

– भाषांतर –

डॉ. सौ. जुल्फिकार बानो देसाई

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व कृपावंत आहे."

उपोद्‌घात

मानवाचे ऐहिक जीवन अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण मनुष्याच्या स्वर्गीय व नारकीय जीवनाचा निर्णय या ऐहिक जीवनामुळेच ठरतो. तुलसीदासांनी म्हटले आहे,

"नरतन सम नहिं कवनिउ देही। जीव चराचर जाचत तेही।
नरक स्वर्ग अपवर्ग निसेनी। ज्ञान विराग भगति सुभ देनी॥"

(अर्थात- या चराचरात जितक्या प्रकारचे जीव आहेत त्या सर्वांत मनुष्य-जन्म श्रेष्ठ आहे. ज्ञान, वैराग्य, भक्ती यांच्या साहाय्याने व या देहाच्या साहाय्याने जिवाचा स्वर्ग, नरक निश्चित होतो.)

म्हणजेच मानवजीवनाला अत्यंत महत्त्व आहे. प्रश्न हा आहे की हे जीवन कसे बसे जगून जगून संपवण्यासाठी मिळाले आहे का एक विशिष्ट प्रकारे जगून आपले ध्येय प्राप्त करण्यासाठी मिळाले आहे? सत्यपरायण आणि धर्मपरायण लोक याचे उत्तर देतील की सत्य व धर्म यांचे पालन करून प्रभुकृपा मिळविण्यासाठी हे आयुष्य मिळाले आहे. पुन्हा प्रश्न निर्माण होतो. कोणत्या मार्गाचे, धर्माचे, विधीचे पालन केल्याने प्रभुकृपा मिळून ध्येय प्राप्त होईल? या प्रश्नाच्या उत्तरासाठी जेव्हा आपण धार्मिक जगाकडे पाहतो तेव्हा आपल्याला तेथे अनेक धर्मांची गर्दी झालेली दिसते. काही लोकांच्या मते धर्माधर्मांत जरी विरोध दिसत असला तरी सर्व धर्म आणि त्यांतील सत्य समान आहे. कोणत्याही धर्माचे पालन करून मनुष्य जीवनाचे ध्येय प्राप्त करू शकतो. परंतु काही विद्वानांच्या मते इहलोक आणि परलोक, ईश्वर आणि मनुष्य हे दोन वेगवेगळे बिंदू आहेत. त्यांच्यात एक सरळरेषा ओढता येऊ शकते म्हणजे ईश्वरापर्यंत पोहोचण्याचा एकच मार्ग उरतो. मनुष्यासाठी एकच धर्म असू शकतो. विद्वानांचा आणखी एक तर्क आहे तो म्हणजे माणसाची बाह्य व आंतरिक रचना एकसारखी आहे. मनुष्य प्राण्यांचा शारीरिक धर्म एकसारखा आहे. सर्वजण खाणे-पिणे, श्वास घेणे, इ. समान प्रकारे करतात. मग ते धर्म जो आत्माचा गुणधर्म आहे, त्या बाबतीतच भिन्न-भिन्न कसे बरे असतील? कारण सर्वांच्या आत्म्याचे स्वरूप एकसारखेच आहे. हा दुसरा विचार बरोबरच आहे. आपण गांभीर्याने विचार केला तर आपल्याला जाणवेल की, मनुष्य नैसर्गिक आणि शारीरिक रचनेत एक समान असले तर त्याचा धर्मदेखील समानच असला पाहिजे. ज्याच्या साहाय्याने तो आपले ध्येय प्राप्त करू शकेल. या विषयावर विद्वान आणि संशोधक नेहमीच विचार करीत आले आहेत.

या छोट्या पुस्तिकेत विद्वानांचे लेख संग्रहित आहेत वाचकांना ते सत्याचा शोध घ्यायला प्रेरित करतील अशी आशा आहे. लेखांमध्ये व्यक्त झालेले तथ्य, तर्क आणि

मते लेखकांची स्वत:ची व्यक्तिगत आहेत. त्यांना सर्वांसाठी हितकर, कल्याणकारी जे वाटले ते लेखांद्वारे समोर ठेवले आहे. लोकांनी त्यावर विचार करावा म्हणून त्यांनी हे त्यांच्यासमोर ठेवले आहे.

या पुस्तिकेच्या प्रकाशनाचा उद्देश लोकांनी सत्याचा शोध घेण्यासाठी प्रेरित व्हावे हा आहे.

हिच्या प्रकाशनाचा हेतू कोणत्याही धर्माचा उपहास करणे किंवा अपमान करणे हा अजिबात नाही तर लोकांनी आपले विचार, धारणा, परंपरा इ.वर पुनर्विचार करावा हा आहे. मानवी जीवनाचा आपण गांभीर्याने विचार करावा. मनुष्याने ध्येयप्राप्तीकडे जाणाऱ्या नावेला सोडून कुलक्ष्याकडे जाणारी नौका पकडू नये. पारसमणीऐवजी चमकणाऱ्या काचेच्या गोटीच्या तुकड्यावर गर्व करीत राहू नये. ईश्वराकडे प्रार्थना आहे की त्याने सर्व मानवांना सत्य आणि वास्तव धर्माकडे जाऊन त्याला स्वीकारण्याचा रस्ता दाखवावा.

तथास्तु

-प्रकाशक

सर्वधर्मसमभावाचा दृष्टिकोन

-मुहम्मद फारुक खान

"समाजातील सर्व लोकात परस्पर ऐक्य निर्माण होवो" या इच्छेची अभिव्यक्ती अनेक महापुरुषांनी आजवर केली आहे. ही गोष्ट जनसामान्यांना समजून घेणे अजिबात अवघड नाही. या भावनेचा सर्वजण आदर करतात. मनुष्य जीवन आणि त्याच्या व्यक्तिमत्त्वात सगळ्यात मूल्यवान गोष्ट म्हणजे आस्था आणि धर्म होत. वास्तविक पाहिले तर हेच जीवनाचे साफल्य, सौन्दर्य आणि लालित्य आहे. संवेदनशील आणि चिंतनशील मनुष्याला वाटते, आस्था आणि धर्माच्या पातळीवर लोकांच्या मनात परस्पर आत्मीयता आणि ऐक्य निर्माण व्हावे.

मनुष्याला धर्म प्राणापेक्षा प्रिय असतो. या पातळीवर समाजात ऐक्य निर्माण होणे गरजेचे आहे. नाहीतर दुसऱ्या मुद्द्यावर होणारे ऐक्य फारसे समाधानकारक नसेल. हे ऐक्य पूर्ण ऐक्य असले पाहिजे ही सदाकांक्षा नसेल तर आपण अर्धवट ऐक्यावरच समाधान मानू. हा त्या भावनेचा अनादर आहे.

आस्था आणि धर्माच्या स्तरावर समाजाने एकत्र यावे या पातळीवर समाजात ऐक्य निर्माण करायचे असेल तर यावर एकच उपाय तो म्हणजे सत्याचा शोध घेतला पाहिजे आणि सर्वांनी कोणत्याही चुकीचा मार्ग न अवलंबता त्या सत्या स्वीकार केला पाहिजे. अशा प्रकारे मानवजातीत मोठ्या संख्येने आस्था व धर्माच्या स्तरावर ऐक्य निर्माण झाले तर त्याचा सुखद परिणाम निश्चितपणे समोर येईलच येईल. कारण मानवजीवनातली सर्वांत शक्तिमान, बलवान भावना आस्था आणि धर्म ही असते. धर्म जीवनाचा आत्मा असतो. ही भावना जनसामान्याच्या मनात रुजली तर या स्तरावर ऐक्य स्थापन करण्यात आपण यशस्वी होऊ आणि या ऐक्याचा पाया खोल आणि मजबूत असेल.

धार्मिक पातळीवर ऐक्य निर्माण करणाऱ्यात एक गट असा आहे ज्याने खऱ्या मार्गावर चालायचे सोडून दुसराच मार्ग स्वीकारला आहे. आपल्या ज्ञान, बुद्धी विवेकाच्या साहाय्याने सामान्य लोकांना मदत करणे दूरच उलट सत्यापर्यंत पोहोचण्याचा रस्ताच रोखून धरला या कामासाठी त्यांनी आपले अवघे बुद्धिचातुर्य आणि शैक्षणिक योग्यता पणाला लावली आहे. त्या गटाने प्रचलित धर्मांना सत्य ठरवून, जाहीर करून टाकले की आपण सर्व सामाजिक राष्ट्रीय आणि धार्मिक पातळीवर एक आहोत. सर्व धर्म वेगवेगळे आहेत आणि परस्परविरोधी आहेत, हा एक मोठा गैरसमज आहे. वास्तविक पाहता, सर्व धर्म एकाच ध्येयाप्रत जाण्याविषयी

आपल्याला मार्गदर्शन करतात. सगळेच धर्म सत्य आहेत किंवा त्याचे चिंतन आणि स्पष्टीकरणात थोडा फरक आहे. त्याकडे दुर्लक्ष करणेच इष्ट आहे.

या संदर्भात जर इतिहासाकडे पाहिले तर उपरोक्त सर्वधर्मसमभावाचे विश्लेषण करण्याचे प्रयत्न अनेक लोकांनी केल्याचे दिसते. त्यामुळे सर्वधर्मसमभाव या दृष्टिकोनाला अधिकच बळ मिळते.

अशोक राजाच्या संदर्भात असे म्हटले जाते की, तो सर्वधर्मसमभावाच्या दृष्टिकोनाचा प्रबल समर्थक होता. शिलालेखाचा अभ्यास केला तर त्यातून निष्कर्ष निघतो की, त्याला वेगवेगळे धर्म आणि त्यांची वेगवेगळी रूपे यांच्याबद्दल आदर होता. परंतु त्या धर्माच्या मुळाशी असलेल्या चेतनेला तो अधिक महत्त्व देत होता. तो आपल्या धर्माचा आदर करायचा पण दुसऱ्या धर्माला वाईट म्हणत नसे. कारण त्याला वाटे जो मनुष्य दुसऱ्याला चूक समजतो तो आपल्या स्वतःच्या धर्माला क्षति पोहचवतो.

डॉ. राधाकृष्णन यांच्या मते शांती स्थापना आणि सर्वांनी मिळून मिसळून राहण्यासाठी हा दृष्टिकोन फार महत्त्वाचा व आवश्यक आहे. मानव-जात फार टिकून रहावी असे वाटत असेल तर लोकांत परस्पर सहकार्य आवश्यकच आहे. शिवाय एकाच्या स्वातंत्र्यात दुसऱ्याचे स्वातंत्र्य अडथळा ठरू नये. धर्माच्या बाबतीत औदार्य आवश्यकच आहे. धर्म जर एकमेकांना स्वीकारत नसतील तर त्यांना काही भविष्यच नाही असे समजावे. या युगाची ही गरज आहे. प्रत्येक मोठ्या धर्मा ने मानवाचे चारित्र्य उंचावले आहे. एखाद्या विशिष्ट धर्माने चारित्र्यवान लोक निर्माण केले असे म्हणणे चुकीचे आहे. अशा प्रकारे डॉ. राधाकृष्णन यांनी सर्वधर्मसमभावाचे जोरदार समर्थन केले आहे.

सर्वधर्मसमभावाचे समर्थक आपल्या दृष्टिकोनाचे समर्थन करण्यासाठी वेद, गीता आणि इतर धार्मिक पुस्तकांची उदारहरणे देतात. ते जास्त करून अथर्ववेदातील एक मंत्र उद्युत करतात ज्याचा भावार्थ आहे-

"एकच ज्योत विभिन्न रूपात प्रकट होते."

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वधर्म निधनं श्रेयः परधर्मो भयावद्रः॥

-श्रीमद् भगवद् गीता, अध्याय-३, श्लोक-३५

(अर्थात- चांगले आचरण केलेल्या दुसऱ्याच्या धर्मापेक्षा गुणरहित आपला धर्म अतिउत्तम असतो. आपल्या धर्मात मरणेदेखील कल्याणकारी आहे. दुसऱ्याचा धर्म भय देणारा आहे.)

जगभरात विभिन्न जाती आणि त्यांचे विभिन्न धर्म आहेत. या अनेकांत एकत्वाची भावना स्थापन करण्यासाठी सर्वधर्मसमभाव हा प्रभावी उपाय आहे.

ब्राह्मो समाजाचे संस्थापक राजा राममोहन रॉयदेखील याच परंपरेचा एक दुवा आहेत. १८८६ ई. मध्ये देवेन्द्र यांनी भारतीय ब्रह्म समाज नावाची संस्था स्थापन केली. हिंदू, बौद्ध, इस्लाम इत्यादींच्या धर्मग्रंथातील निवडक वचने एकत्रित करून एक पुस्तक तयार केले गेले.

रामकृष्ण परमहंसदेखील सर्वधर्मसमभावाचे समर्थक होते. त्यांनी कोणत्याही ग्रंथाला नाकारले नाही, तसेच कोणत्याही शास्त्राचा किंवा कर्मकांडाचा विरोधही केला नाही. परमहंसामुळे जुन्या विचारांचे, रुढींचे पालन करणारे लोक दुखावले गेले नाहीत. त्यांना मोठा दिलासा मिळाला.

आपल्या काळात गांधीजी हे एक महत्त्वपूर्ण व्यक्तित्व आहे. त्यांनीदेखील सर्वधर्मसमभावाला पाठिंबा दिला आहे. ते म्हणायचे,

कोणाही व्यक्तीला माझाचा धर्म सर्वश्रेष्ठ आहे आणि जगाने तोच स्वीकारला पाहिजे असे म्हणता येणार नाही, ते योग्य नाही. पुढे ते म्हणतात, "आपण ईश्वराला पाहू शकत नाही तसेच संपूर्ण धर्म आपल्याला दिसत नाही. आपण जो धर्म कल्पू किंवा रचू तो पूर्ण असू शकत नाही. त्यात काही त्रुटी किंवा उणिवा निश्चितच असणार, ज्याने हे सत्य समजून घेतले असेल तो आपल्या धर्मातील उणिवा नक्कीच समजून घेईल.

गांधीजींचा हा सिद्धान्त सांगतो की, माणसाने आपल्या धर्मालाच सर्वश्रेष्ठ समजू नये परंतू त्याचा त्यागदेखील करू नये. त्याबरोबरच आपल्या धर्मातल्या उणिवादेखील जाणून घ्याव्यात.

हे विश्लेषण पाहता एक गोष्ट लक्षात येते की सर्वधर्मसमभावाच्या समर्थकांत चिंतनाचा अभाव दिसतोय. चिंतन आणि संशोधनऐवजी त्यांनी इच्छावाद किंवा इच्छाभक्तीला महत्त्व दिले आहे. त्यांच्या मनात एकत्वाची भावना असो किंवा या धर्माच्या दृष्टिकोनाची पुष्टी करणे असू दे. त्या लोकांना धर्माचा खरा अर्थदेखील माहीत नाही.

वस्तुतः ईश्वराची इच्छा जाणून त्यावर चालण्याचा मार्ग म्हणजे धर्म होय. धर्म आपल्या व्यक्तिगत आवडीचे अनुसरण करण्याचे नाव नाही खरे तर ईश्वरभक्ती आणि सत्यनिष्ठा म्हणजे प्रत्येक माणसाने हे जाणून घ्यायला अस्वस्थ झाले पाहिजे की सत्याचे स्वरूप आणि ईश्वराला काय हवे आहे? याचे उत्तर मिळविण्यासाठी त्याने बेचैन झाले पाहिजे. जर ईश्वरप्रणीत मार्ग सोडून विभिन्न मार्गांवर भटकल्यामुळे व

त्यातल्या प्रत्येक मार्गाला सत्य मानण्यामुळे धर्म विकृत आणि निरूपयोगी होतो.

जर माणसाला या गोष्टीची चिंताच नसेल की, आयुष्याची खरी कार्यप्रणाली कोणती आहे आणि ईश्वराची त्याच्याकडून काय अपेक्षा आहे? आहे त्या दशेत तो जर समाधानी असेल तर ईश्वराशी त्याची निष्ठा कशी व्यक्त होईल?

सर्वधर्मसमभावाच्या समर्थकांना हे माहीत नाही का? की विभिन्न धर्म केवळ संख्येत वेगवेगळे नाहीत तर त्यांच्यात अनेक मूलभूत विरोधी तथ्य आहेत आणि त्यांच्यात सांमजस्य प्रस्थापित होणे कठिण आहे. अशा परिस्थितीत सर्व धर्मांना समाज समजणे योग्य नाही. म्हणजे धर्माचा बुद्धी आणि विवेकाचा काहीच संबंध नाही असे समजणे होय.

मनुष्य ज्या गोष्टीचे समर्थन त्याचे अंत:करण आणि बुद्धीने करणार नाही त्याचे अनुसरण कसा काय करील? कारण माणसाची बुद्धी आणि अंत:करणदेखील त्याच्या अस्तित्वाचा अत्यंत शक्तिशाली भाग आहे. मग ही गोष्ट धर्मविमुख लोकांना धर्माच्या जवळ आणण्याचे साधन कसे बनू शकेल? खरे तर धर्म त्यांच्या दृष्टीने हास्यास्पद बनेल आणि ते म्हणतील आम्ही कोणतीही अयोग्य गोष्ट स्वीकारणार नाही. ही मागणी तर मूर्खपणाची आणि अनैतिक ठरेल.

औदार्याचा अर्थ असा मुळीच नाही की, चुकीची गोष्ट बरोबर मानायची आणि सर्वोत्तम गोष्टीला सर्वोत्तम आणि श्रेष्ठ म्हणायचे नाही. यामुळे आपण खऱ्या संशोधनाची भावना चिरडून टाकणारे अपराधी ठरू. खरे औदार्य, सहिष्णुता आणि न्यायप्रियता म्हणजे आपण प्रत्येकाचा मूलभूत अधिकार स्वीकार करायचा आणि ज्या गोष्टीला बरोबर समजू त्यामुळे इतरांच्या अधिकाराचे हनन होऊ द्यायचे नाही.

ज्या लोकांनी हे मानले आहे की जगभरात आज जितके म्हणून धर्म आहेत ते सर्व एक आहेत फक्त पारिभाषक शब्द वेगळे आहेत त्यांचा अभ्यास अगदीच उथळ आहे. पूर्ण अभ्यासाने मनुष्य या निष्कर्षापर्यंत पोहचू शकतो की सत्यधर्म नेहमीच एक असतो आणि त्याला तसेच असले पाहिजे. त्या सत्यधर्माचा शोध ही माणसाची सगळ्यात मोठी जबाबदारी आहे. विकृती मुळे एखाद्या वस्तुची विभिन्न रूपे दिसतात. अशा परिस्थितीत मूळ वस्तुचा शोध घेतला पाहिजे. स्वार्थासाठी प्रत्येक वस्तुचे समर्थन करण्यात आपली शक्ती व उर्जा आपण खर्च करू नये. संशोधन करताना कुरआन आपले मार्गदर्शन करू शकतो पण त्यासाठी आपण गांभीर्याने या समस्येचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. याचा परिणाम म्हणून जर आपल्याला सत्यधर्म सापडला तर तो मानवजातीचा एकमात्र मूलधर्म असेल आणि तोच सर्वांसाठी स्वीकार्य असेल. श्रद्धा आणि धर्माच्या पातळीवर जे एकत्व प्रस्थापित होईल तेच चिरकालिक असेल.

सर्वधर्मसमभाव - एक निरीक्षण

-मुहम्मद जैनुल आबिदीन मंसुरी

मानव समाजात आपल्याला विचारातील वैविध्य, विविध विचारधारा आणि मान्यता नेहमी दिसतात. पृथ्वीवरील जीवसृष्टीत केवळ मानव हा असा प्राणी आहे की ज्याला ईश्वराने मनन-चिंतन करून आपल्या आचारातील कोणते बरोबर व कोणते चूक याचा निर्णय करण्याची क्षमता आणि अधिकार दिले आहेत.

या संदर्भात ईश्वराने नकारात्मक आचरण सोडून सकारात्क नीति स्वीकारण्यासाठी त्याला दोन प्रकारचे मार्गदर्शन दिले आहे-

१) मनुष्याच्या अंतरात्म्यात भले-वाईट, पाप-पुण्य, न्याय-अन्याय, सत्य-असत्य यातून सकारात्मक बाजूला स्वीकारण्याची इच्छाशक्ती आणि नकारात्मक बाजू सोडून देण्याची इच्छाशक्ती निर्माण केली.

२) ईश्वरी ग्रंथ आणि ईशदूतांद्वारे माणसाला त्याने सत्यमार्गावर चालावे, सत्यनीति स्वीकारावी तसेच असत्य मार्गाचा त्याग करण्याची प्रेरणा व मार्गदर्शन मिळावे, तत्संबंधी ज्ञान व शिक्षण त्याला मिळावे म्हणून व्यवस्था केली आहे.

ईश्वराने अशा प्रकारे माणसाच्या आयुष्याला एक परीक्षा, जगाला परीक्षास्थळ बनविले आहे. मानव ईश्वरप्रदत्त स्वतंत्र चयनशक्ती आणि विवेकाने सकारात्मक दिशेने सत्य व न्याय मार्गावर चालतोय की मानवीय मूल्ये, दैवी आदेश यांची अवहेलना व तिरस्कार करून असत्य व अन्यायी मार्गावर चालून भौतिक लोभाचा अनुयायी बनून जीवन व्यतीत करतोय? हे त्याला पारखायचे आहे. ईश्वराने ईशग्रंथ व ईशदूतांच्या माध्यमातून हे स्पष्ट केले आहे की, या परीक्षेत सफल होणाऱ्यांसाठी शुभ परिणाम आहेत. आणि असफल होणाऱ्यांसाठी अशुभ परिणाम म्हणजे इहलोकात दुःख, अशांती आणि पारलौकिक जीवनात नरकयातना आहेत.

धर्माची प्रमुख भूमिका मानवजातीला सत्यमार्ग दाखविण्याची आहे. तसेच स्वतः धर्म एक पूर्णरूप सत्यपथदेखील आहे. मानवजातीचे एक दुर्दैव असे आहे की त्याने ईश्वराबद्दलच्या कृतघ्नतेमुळे व संवेदनहीनतेमुळे धर्माच्या या दोन्ही शक्तिस्थानांना इजा पोहोचविली आहे. धर्माला पथदर्शनात यर्थार्थ भूमिका बजावण्याची योग्य संधी मिळू दिली नाही.

याचा परिणाम असा झाला की, समाज आणि संपूर्ण जग अन्याय, अत्याचार, अशांती, भ्रष्टाचार आणि शोषण इत्यादी अपराधांने भरुन गेले. या शोकांतिकेचे,

धर्माच्या अध:पतनाची अनेक कारणे आहेत. त्यातील मूलभूत कारणांपैकी एक कारण आहे, मानवाद्वारा सत्यधर्माचे तुकडे-तुकडे होऊन विखुरले जाणे आणि त्याचे अनेक धर्मांमध्ये वाटले जाऊन कमकुवत होत प्रभावहीन होणे.

धर्म एक का अनेक?

मनुष्य आपल्या जीवनात सभोवताली पसरलेल्या अनेक प्रकारची विषमता, विविधता याचा अनुभव घेतो. काही बाबींमध्ये 'विविधतेत एकता' (Unity in diversity) विषमतेत समता हे सूत्र स्वीकारतो. पण सत्यातदेखील भिन्नता विरोधाभास असू शकतो. हे त्याची बुद्धी स्वीकारू शकत नाही. जर तीन अधिक एक चार होत असतील तर तीन आणि दोन, तीन आणि चार, तीन आणि सात मिळून चार कसे होतील? जर सत्य एक आहे तर मग शाश्वत सत्य (Eternal truth) ईशसत्य (Divine Truth), जगतव्यापी सत्य (Prevading of universe) अर्थात सत्यधर्म तो अनेक कसा असेल? जर एक राष्ट्र अनेक राज्यघटनांद्वारे संचलित होऊ शकत नसेल तर मानवजातीचे संचलन सर्वतत्त्वदर्शी ईश्वर अनेक धर्मांची रचना का करेल? मानवासाठी अनेक परस्परविरोधी धर्म निर्माण करून, त्यांची भांडणे करून, हिंसाचार माजवून जगात अराजक पसरवू देण्याची चूक ईश्वर करू शकेल का? ईश्वराबद्दल असा दुर्विचार आपण कदापि करू शकणार नाही सत्य जाणून घेण्यासाठी आपण सत्यावर निष्ठा ठेवून या गोष्टीचा विचार करायला हवा की सत्यधर्म अनेक आहेत का एक... केवळ एक!

एक, केवळ एक!

जगभरातील सर्वांत मोठ्या सत्याचा अनुभव आपल्याला येतो ते सत्य असे...

ईश्वर एक आहे. अनेक नाही.

परमसत्य आदिसत्यदेखील एक आहे.

ज्या मातापित्यापासून मानवजात जन्माला आली ती जोडी एकच होती.

आदिकाळापासून मनुष्याची जन्मप्रणाली एकच आहे.

आदिमकाळापासून मनुष्याच्या शरीराची रचना (हात, पाय, कान, इंद्रीय, रक्त इ.) एकाच प्रकारे व एकाच प्रकारच्या तत्त्वापासून होत आली आहे.

मनुष्य कोणत्याही युगातील, क्षेत्रातील, वंशातील रंगाचा असो त्याच्यात काही गुण व अवगुण शाश्वत सत्याच्या रूपात असतातच. जसे गुण- प्रेमभाव, दया, माया, आशा, आनंद, क्षमा इ. अवगुण- सुडाची भावना, निराशा, गर्व इ. याला कोणी

ब्रह्माण्ड एक आहे. वायुमंडल एक आहे. या भौतिक व नैसर्गिक नियमानुसार पृथ्वी व प्रकाश आहे. त्याचे सर्व नियम प्रत्येक ठिकाणी व प्रत्येक काळात एकसारखेच आहेत.

माणसाच्या मूलभूत गरजा (अन्न, वस्त्र, पाणी, निवारा, हवा, सूर्यप्रकाश, शक्ती, आरोग्य, झोप इत्यादी.) नेहमीच एकसारख्या राहिल्या आहेत. त्याच्या बुद्धीला, विवेकाला हेच स्वाभाविकपणे वाटत आले आहे की सत्यधर्म एकच असला पाहिजे. अनेक नव्हे.

व्यावहारिक पातळीवर धार्मिक अनेकता

बुद्धी, विवेकाच्या पातळीवर तात्त्विक धार्मिक ऐक्याला मानूनही व्यावहारिक दृष्टिने धर्मात अनेकता आढळते. कोणत्याही गोष्टीची व्यावहारिक आणि तात्त्विक स्थिती परस्पर विरोधी असेल तर तिची तात्त्विक बाजू नष्ट होऊ शकत नाही. उदाहरणार्थ, एखादी स्त्री जर आपल्या पतीबरोबरच दुसऱ्या पुरुषाला पती समजू लागली तर ही गोष्ट असामान्य आणि अमान्य ठरेल आणि तिच्या पतीच्या पतित्वाच्या भावनेला ती खोटी किंवा पराभूत समजला येणार नाही.

याचप्रकारे मानव समाजात अनेक चुकींमुळे, कारणांमुळे धर्म अनेक निर्माण झाले असतील तर ती अस्वाभाविक गोष्ट आहे. माणसाच्या चुका, काटछाट, संशोधन हस्तक्षेप यामुळे सत्यधर्म ज्याला म्हणतात. त्याचे अनेक तुकडे झाले आहेत.

धर्मातील विभन्नता, असमानता

आपण जेव्हा गांभार्याने आणि प्रामाणिकपणे आणि विवेकाने धर्मांकडे एकाग्र दृष्टीने पाहतो तेव्हा काही

१. काही धर्मानुसार उपास्य केवळ एक आहे. दुसऱ्याच्या मते उपास्य तीन आहेत तर तिसऱ्या धर्माच्या मते असंख्य उपास्य आहेत.

२. एक धर्म म्हणतो ईश्वर कोणाचा पुत्र नाही की त्याला कोणी पुत्र नाही. दुसरा म्हणतो त्याचा एक पुत्र आहे. म्हणजे तो निराकार असूनसुद्धा तो पिता आहे.

३. एका धर्मात दारू, जुगार, नशेबाजी, परस्त्रीगमन अवैध आहे. दुसऱ्या धर्मात ते वैध आहे.

४. एक धर्म सांगतो की इहलोकातील जीवनाचा अंत झाल्यावर पारलौकिक जीवन आहे. दुसरा म्हणतो या जीवनाचा अंत झाल्यावर पारलौकिक जीवन आहे. दुसरा म्हणतो या जीवनाचा अंत झाल्यावर मनुष्य पुनःपुन्हा जन्म घेतो. तर तिसरा धर्म या जीवनानंतर कोणत्याही जीवनाला नकार देतो.

५. एका धर्मानुसार मनुष्य आपल्या सत्कर्म किंवा दुष्कर्माबद्दल ईशन्यायालयात निवाडा

होऊन स्वर्ग किंवा नरक प्राप्त करेल. एका धर्मानुसार वर्णव्यवस्थेतील उच्च वर्ग स्वर्गात जाईल इतर नरकात जातील. तिसरा धर्म म्हणतो एका महापुरुषाला ईशपुत्र मानले की स्वर्ग प्राप्ती होईल. चौथा धर्म म्हणतो या जीवनातील सुख-दुःखे म्हणजेच स्वर्ग-नरक होत. कोणी म्हणते, मनुष्य आपल्या पुण्यकर्मांमुळे मृत्यूनंतर मनुष्य जन्म घेतो आणि सुख भोगून परत जातो. तसेच पापकर्मामुळे तो लुळापांगळा, महारोगी, दरिद्री, दुःखग्रस्त मनुष्य बनतो नाही तर कुत्रा, मांजर, कीटक, गाढव व घोडा इत्यादिंच्या जन्माला येतो.

६. एक धर्म म्हणतो आत्मा व शरीर परस्पर साहाय्यक आहेत. ते दोघे मिळून मानव जीवन कार्यान्वित करतात. तर दुसरा म्हणतो, हे शरीर आत्मासाठी कारावास आहे.

७. एका धर्मात नरकाच्या अग्नीपासून सुटका प्राप्त होणे म्हणजे मुक्ती आहे, तर दुसरा आत्मा शरीराच्या बंधनातून मुक्त होणे म्हणजे मोक्ष, मुक्ती मानतो.

८. याशिवाय जगात असे अनेक धर्म आहेत जे ईश्वराच्या मानवी जीवनाशी काही संबंधच नाही असे मानतात. काही म्हणतात की काही मानवी गुण, मूल्ये आपल्यात रुजवणे हेच उच्चतर मनुष्यत्व आहे. ईश्वर आहे की नाही ही चर्चाच व्यर्थ आहे. काही धर्म एखाद्या व्यक्तीच्या चिंतनमननाने जन्मला आहे तर काही धर्म संस्कार आणि परंपरांवर बनलेत, काही धर्मांत अंधविश्वास भरलेत तर काही पौराणिक कथांनी भरलेत.

एखाद्या धर्माचा आधार राष्ट्र आहे तर एखाद्याचा संस्कृती. काहींना धर्माची व्याख्याच माहीत नाही. काही जण आपला प्रामाणिक धर्मग्रंथ सांगू शकत नाहीत. ते ग्रंथ कोणावर अवतरित झाले? कोणी लिहिले? त्यातील सामग्री नेमकी किती होती? कशाबद्दलही त्यांना सांगता येत नाही.

या परिस्थितीत खालील गोष्टी आपण प्रामाणिक खऱ्या मानून त्यांचा प्रचार करू शकत नाहीत उदाहरणार्थ-

- सगळे धर्म सत्य आहेत.
- सर्व धर्म समान आहेत.

सर्व धर्म (मार्ग) एकाच दिशेने जातात जरी ते परस्परविरोधी मार्गाने किंवा निरनिराळ्या मार्गाने जात असले तरी धर्माधर्मांत विभेद, परस्परविरोध असला तरी सर्व धर्म एकाच ध्येयाकडे मनुष्याला घेऊन जातात.

म्हणूनच सर्वधर्म समानता, सर्वधर्मसमभाव व सर्वधर्मसामंजस्य नीती हीच सर्व सत्यनीती असून ती सर्वस्वीकार्य.

सर्व धर्म एकसारखे नाहीत

सगळे धर्म सत्य आणि समान कदापि नाहीत. हे केवळ सैध्दान्तिकच नव्हे तर व्यावहारिक तथ्य ही आहे. जे लोक सर्व धर्मांना समान मानतात तेदेखील व्यावहारिक पातळीवर याचे खंडन करतात.

कोणताही धार्मिक मनुष्य मस्जिदमध्ये नमाज अदा करतो तेव्हा तो मंदिरात जाऊन मूर्तीपूजा करीत नाही आणि चर्चमध्येही येशूच्या प्रार्थनेत हजेरी लावत नाही. जर एक व्यक्ती दुसरा धर्म स्वीकारेल तर त्याचा विरोध किंवा तिरस्कार केला जायला हवा होता. समाजात हिंसाचार झाला असता, धर्मांतर विरोधात कायदा केला गेला असता जर सारेच धर्म सत्य असते तर... मनुष्य एका सत्याकडून दुसऱ्या सत्याकडे जात असेल तर मग इतका रोष, अशांती का? ही गोष्ट हेच सिद्ध करते की, सर्वधर्मसमानता एक घोषणा होऊ शकते सत्य नव्हे.

सत्य-धर्माचा शोध

उपरोक्त निष्कर्षापर्यंत आत्म्यावर शाश्वत, जगतव्यापी, परम सत्याचा शोध घेणे हे आपले परम कर्तव्य ठरते. हा शोध अनुमान किंवा अंदाजावर घेता येणार नाही. हा शोध अनुमान किंवा अंदाजावर घेता येणार नाही. धर्म जीवनाचा एक गंभीर आणि महत्त्वपूर्ण विषय आहे. त्याचा विचार निष्ठेनेच व्हायला हवा. यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे आपल्यासमोर असली पाहिजेत.

उदाहरणार्थ- तो धर्म,

१. आपल्या मानवाच्या जन्माचा उद्देश सांगतो का? नसेल तर तो स्वीकार्य नाही. आणि जर सांगत असेल तर तो उद्देश कोणता?

२. मृत्यूनंतरच्या जीवनाचे स्पष्टीकरण तो स्पष्ट व पूर्ण पारदर्शी रूपात करतो की नाही?

३. ईश्वराचे सत्यरूप आपल्याला सांगतो आहे की नाही? त्या वास्तवात शंकाभ्रम इ. नसला पाहिजे.

४. आपल्यासाठी जे मार्गदर्शक केले आहे. त्याची बहुआयावी आणि विश्वसनीय व्यवस्था त्याने केली आहे का?

५. ईश्वर आणि मानव यांच्यातला संबंध तो स्पष्ट करतो आहे की नाही? आणि यासाठी त्याच्याजवळ ईशप्रणीत आणि विश्वसनीय माध्यम आहे का?

६. ईश्वराचा आपल्यावर जो अधिकार आहे म्हणजे त्याच्याबाबतीत आपली कर्तव्ये तो स्पष्टपणे सांगतो आहे का?

७. तो अनुकूल प्रतिकूल परिस्थितीत आमच्या बरोबर राहतो आम्हाला आधार देतो सांभाळतो का अशा परिस्थितीत तो पूजास्थल, मंदिर, उपासना घरात राहून आम्हाला पराभूत व्हायला धक्के खायला सोडतो?

बुद्धिमत्ता काय सांगते?

परस्परविरोधी आणि भिन्नभिन्न धर्मांना समान मानते हे बुद्धीचे लक्षण नाही तर प्रचलित धर्मांना वरील कसोटीवर पारखून सत्य धर्माचा शोध पूर्वग्रह न ठेवता, भावुक न होता, दुर्भावना मनात न ठेवता घेतला जाणे बौद्धिक पातळीवर अपेक्षित आहे. धार्मिक भिन्नतेत काही धर्मांत (ख्रिश्चन, यहुदी, सनातन हिंदू आणि इस्लाम) काही बाबतीत साम्य आढळते. उदा. एकेश्वरवाद, परलोकवाद इत्यादी. याबरोबरच काही वैषम्यदेखील आढळते. या असमान गोष्टीचे कारण आणि कारक यांच्या वास्तव जाणले. तरच आपल्याला धर्माची अनेकता म्हणजे काय? हे आपल्याला कळेल. या समस्येची उकल करण्याचा व्यापक पातळीवर प्रयत्न केला गेला नाही. म्हणूनच संपूर्ण विकृत समाज आणि विशेषकरून भारतीय समाज धर्माच्या अनैक्याच्या वास्तवाला व्यावहारिक स्थितीला सैध्दान्तिक सत्यस्थिती मानण्याची चूक करतो आहे. या बाबतीत इस्लामचा पक्ष स्पष्ट, सरळ आणि बुद्धिसंमत आहे.

सर्वधर्मसमभावसंबंधी इस्लामचा दृष्टिकोन

धर्म ईश्वरापासून उद्‌भूत आहे. ईश्वर एक आहे धर्म मानवासाठी आहे मानवजात एक आहे आणि शाश्वत सत्यधर्मदेखील एक आहे. या सत्यधर्माच्या तीन मूलभूत धारणा आहेत-एकेश्वरवाद, परलोकवाद आणि ईशदूतत्व पृथ्वीवर मानवाची उत्पत्ती या तीन धारणांवर आधारित धर्मासह झाली आहे.

प्रथममानव आदम स्वत: नबी- ईशदूतदेखील होते. त्यांचा धर्म एकेश्वरवाद, परलोकवाद, ईशदूतवाद यांवर आधारित होता. इतिहासाच्या विभिन्न टप्प्यांवर ईश्वराने मानवजातीच्या मार्गदर्शनासाठी जे ईशदूत नियुक्त केले आणि त्यांच्यावर जे ईशग्रंथ अवतरित केले त्यात सर्वांना उपरोक्त तीन मूलभूत तत्त्वांवर आधारित पथदर्शन केले गेले आहे. कालांतराने मनुष्याच्या चुकांमुळे सत्यधर्मात बदल होत राहिले. तरीही धर्मग्रंथामध्ये काही मर्यादेपर्यंत सत्यधर्म शिल्लक व सुरक्षित राहिला.

विभिन्न युगांत ईशदूत (नबी, रसूल, ऋषी) यांच्या शिकवणींच्या बाबतीतही असे घडले की त्यामुळे काही धर्मात आज साम्य आढळते आहे. खरे तर ही समानता आंशिक आहे, अपूर्ण आणि अशुद्धही आहे. परंतु या साम्यामुळे सर्व धर्म समान रूपाने सत्य आहेत असा गैरसमज पसरला.

इस्लाम या गैरसमजुतीचे निराकरण एका तर्काद्वारे करतो की, जर हे साम्य परिपूर्ण असते तर इतके वेगवेगळे धर्म प्रचलित झाले नसते. एकाच सत्यधर्माचे प्रचलन झाले असते. व्यावहारिक पातळीवर वेगळे चित्र आहे. विविध धर्मांत साम्याबरोबर काही विषमताही आहेत. इस्लामने याचे कारण स्पष्टपणे सांगितले आहे.

विविध धर्मांत भिन्नतेचे कारण

इस्लामने एक ऐतिहासिक तथ्य सांगितले आहे का? मानवजातीच्या दीर्घ इतिहासाच्या विविध टप्प्यांवर मानवाच्या चुकीमुळे, बेपरवावृत्तीमुळे कधी-कधी मुद्दाम ईशग्रंथ, ईशदूत यांच्या शिकवणुकीत बदल होत राहिले. परिणामत: सत्य धर्माचे स्वरूप बदलत गेले व अनेक धर्मांची निर्मिती झाली. या परिस्थितीला सुधारण्यासाठी ईश्वर वारंवार आपल्या दूतांना पाठवून त्यांच्यावर ईशग्रंथाचे अवतरण करीत राहिला परंतु त्यांचा उद्देश मूळ सत्यधर्माची पुनर्स्थापना होता असे दिसून येते.

शेवटी ते युग आले ज्यात ईश्वर ग्रन्थ, ईशदूत यांच्या शिकवणुकींना सुरक्षित ठेवण्याची व विकृत होण्यापासून वाचविण्याची साधने उपलब्ध झाली तेव्हा सत्यधर्म मूळ व शुद्ध स्वरूपात मानवजातीला दिला गेला त्यालाच इस्लाम म्हणतात. कुरआनात म्हटले आहे,

"ईश्वराजवळ नि:संशय धर्म फक्त इस्लाम आहे व सत्यापासून असत्याला वेगळे केले गेले आहे."

(कुरआन २ : २५६)

मानवाच्या चुकामुळे सत्य-असत्याचे मिश्रण होऊन विभिन्न धर्म बनले आणि एक गैरसमज पसरला की हे सर्व धर्म सत्य आहेत आणि सगळे एकाच ध्येयाप्रत नेतात. सर्व धर्मांवर श्रद्धा असली पाहिजे. इस्लामने या भ्रमाचे निराकरण केले आणि सत्य धर्म तो एकच आहे. (इसका नाम अनेक युगों, भूभागों और भाषाओं में जो भी रहा हो वह सदा एक ही रहा है) असे सांगितले,

सत्य धर्माचा शोध पूर्ण झाला

अशा प्रकारे अभीष्ट सत्य धर्माचा शोध पूर्ण झाला. यातील तीन मूल धारणातील एक एकेश्वरवादांत आली आहे. अनेश्वरवाद किंवा बहुदेववादाची अशुद्धता दूर करून इस्लामने सम्पूर्ण एकेश्वरवाद पुन:स्थापित केला. परलोकवाद धारणेत काही त्रुटी-उदा. स्वर्ग, नरक, मृत्युनंतरचे जीवन, मुक्ती इ. बाबतीत विरोधी धारणा आल्या होत्या या सर्वांचे निराकरण करून विशुद्ध परलोकवादी धारणेची पुन:स्थापना केली गेली.

तसेच ईशदूतवादात परिवर्तन आले होते उदा. ईशदूताला ईश्वरसंतान स्वत:

ईश्वर मानले जाऊ लागले होते इस्लामने हे सगळे विकार दूर करून ईशदूतवाद शुद्ध स्वरूपात पुन:स्थापित केला.

उपरोक्त तिन्ही अवधारणांवर आधारित संपूर्ण आध्यात्मिक नैतिक, वैयक्तिक आणि सामूहिक जीवन व्यवस्थेचे नाव इस्लाम आहे. हा सत्यधर्म प्रत्येक क्षणी माणसाबरोबर ईश्वराला व ईश्वराला माणसाबरोबर ठेवतो.

अशाप्रकारे धर्माचे ऐक्य प्रमाणित होते यामुळे वैश्विक बंधुत्वाकडे आपण वळतो.

इस्लामचे वैशिष्ट्य म्हणजे निवडीचे स्वातंत्र्य आणि मानवाधिकार होय. प्रत्येक मनुष्याला ईश्वराला बुद्धिविवेक देऊन सत्य धर्म असत्य धर्म ईश्वरीय धर्म ईश्वरविहीन किंवा ईश्वराधित धर्म यापैकी त्याने कोणाचीही निवड करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. त्यानुसार वागून त्याने त्याचे काही परिणाम या जीवनात तर काही पारलौकिक जीवनात मिळवायचे आहेत. माणसाला सत्यधर्मा (इस्लाम) कडे बोलविण्याचे आदेश ईश्वर आणि ईशदूत मुहम्मद (स.) पैगंबरांकडून आलेले आहेत. दुसऱ्या धर्माच्या व्यावहारिक अस्तित्वाला मान्यता देण्याचे आदेश ही आहेत.

समानता किंवा समभावाच्या नावावर गोंधळ माजवून सत्य धर्माला बाधा आणण्याचा आदेश मात्र अजिबात नाही.

इस्लाम समभावाची नाही सद्‌भावाची बाजू घेतो. त्याचा आपल्या अनुयायींना आदेश आहे की प्रत्येक धर्माबरोबर मानवी बंधुत्वाची भावना, सौहार्द, सहकार्य, क्षमा, दया इ.चे वर्तन ठेवावे. परंतु याचा अर्थ सत्य-असत्य एकसारखेच मानावे असा नाही. ही ईश्वराची प्रतारणा ठरेल, कृतघ्नता ठरेल. यामुळे मानवजात तुकड्यातुकड्यांत विखुरली गेली आहे. इस्लाम मात्र एक सत्यधर्माचे आवाहन करून ऐहिक जीवनात मानवाला एकत्र करू इच्छितो. या सत्यधर्माच्या मार्गाने जाऊन पारलौकिक जीवनात मानवजात दयाळू ईश्वराचे अनुयायी होऊन नरकाग्नी पासून मुक्ती मिळऊन स्वर्गाचे अनन्त सुख भोगेल.

धर्म एक की अनेक?

-डॉ. सैयद शाहिद अली

नॉलेज (Knowledge - ज्ञान) चा अर्थ आहे आकलन (understanding). हे आकलन चार प्रकारचे असते- (१) ईश्वराविषयी, (२) मनुष्याबद्दलत, (३) जगाविषयी आणि (४) मृत्यूनंतरच्या स्थितीविषयी मनुष्याच्या आकलनाचा संबंध, बुद्धीशी असतो परंतु बुद्धी अपूर्ण असते.

अ) बुद्धी सांगते, सृष्टा असला पाहिजे. पण सृष्टीपासून त्याला काय हवे आहे हे ती सांगत नाही.

ब) मृत्यूनंतर जीवन असले पाहिजे. पण ते कसे असेल हे ती सांगू शकत नाही.

क) माणसाने उपासनेद्वारे सृष्टाचे आभार मानले पाहिजेत, पण ते कसे हे बुद्धी सांगू शकत नाही.

बुद्धी म्हणते, या मूळ प्रश्नांची उत्तरे बुद्धी देणाऱ्याकडूनच मिळाली पाहिजेत. कारण मानव स्वतः या प्रश्नाची उत्तरे शोधू शकत नाही. माणसाला योग्यप्रकारे जीवन व्यतीत करण्यासाठी आणि तोट्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी या प्रश्नांची उत्तरे शोधू शकत नाही.

माणसाला योग्य प्रकारे जीवन व्यतीत करण्यासाठी आणि तोट्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी या प्रश्नांची उत्तरे त्याला माहीत होणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ-

• मनुष्याचे स्वत:शी नाते कसे असावे?

• मानवा मानवामध्ये कोणते नाते असले पाहिजे?

• मनुष्य आणि ब्रह्मण्ड यांचे नाते कसे व काय आहे?

• मनुष्याचा संकटे व सुख, सुख-दुःख यश-अपयश यांच्याशी कसा संबंध असावा?

• मनुष्याचा आहाराशी, संपत्ती व दारिद्र्याशी, लैंगिक जीवनाशी कसा संबंध असावा?

• थोडक्यात मानवासाठी काय योग्य व काय अयोग्य, काय फायद्याचे व काय तोट्याचे आहे?

जगातील सर्व प्रकारच्या ज्ञानाला दोन प्रकारात विभागता येईल– १) अनुभवाने मिळविलेले ज्ञान आणि २) ईश्वराकडून दिले गेलेले ज्ञान.

पहिल्या प्रकारचे ज्ञान (Social Sciences, Humanities & language etc) ज्ञानेन्द्रियांच्या (Five senses) मदतीने प्राप्त होते. ते मनुष्य आणि ब्रह्मांडाचे स्वरूप

स्पष्ट करते आणि त्याचे वर्णन करते.

दुसऱ्या प्रकारचे ज्ञान ज्ञानेन्द्रियांच्या मदतीशिवाय नबी, पैगंबरांना, ईशदूतांना सरळ ईश्वराकडून मिळते. मनुष्याची निर्मिती का झाली? याचे उत्तर या प्रकारचे ज्ञान देते.

धर्म ईश्वराकडून दिलेल्या ज्ञानाचे नाव आहे. हे आपल्या मूलभूत प्रश्नांची उत्तरे देते जी आपल्याला दुसरीकडून अजिबात मिळत नाहीत.

उदाहरणार्थ- १) आपली निर्मिती करणारा कोणी आहे का? २) असेल तर त्याला आमच्याकडून काय हवे आहे? ३) आम्ही कोठून आलोय? का आलोय? आणि आम्हाला जायचे कोठे आहे? आम्ही कोणाच्या अधीन आहोत की स्वतंत्र?

बरेच लोक म्हणतात, आधुनिक युगात धर्माची गरजच नाही. हे चूक आहे. आधुनिकतेचा संबंध जीवन व्यतीत करण्याच्या शैलीशी आहे. प्राचीन काळी मनुष्य पायी चालत होता. आज कार आणि विमानाने प्रवास करतो. धर्माचा संबंध न्याय, सत्य, प्रामाणिकपणा, निष्ठा यासारख्या मूल्यांशी आहे.

हजार वर्षांपूर्वी गावाचा सरपंच पायी चालत ग्रामपंचायतीत पोहोचत असे. कट्ट्यावर बसून न्याय देत असे. आज सर्वोच्च न्यायालयाचा जज्ज कोर्टात कारने जातो. टेबल-खुर्चीवर बसून कॉम्प्यूटरच्या मदतीने न्यायनिवाडा करतो. सरपंच असो की जज्ज दोघांसाठी केसचा निकाल लावणे याला सारखेच महत्त्व आहे. न्याय देणे याला हजार वर्षांपूर्वी जेवढे महत्त्व तेवढेच आजही आहे. न्याय धर्माशी निगडीत आहे. एक मूल्य आहे. म्हणून धर्म प्रत्येक युगात मानवासाठी आवश्यक आहे.

जगभरातील ज्ञान मनुष्याला जीवनशैलीबद्दल प्रगत विचार सांगते व माणसाच्या आरोग्याची देखरेख करते. मनुष्य आधी पायी चालत होता. नंतर बैलगाडीने प्रवास करू लागला. नंतर कारने. मग विमानाने. मग मरीन आणि स्पेस-शटलने! आधी तो लाकडांवर स्वयंपाक करत होता, आज गॅस आणि ओवनवर.

धर्म मनुष्याला प्रगत बनवितो. तो मनुष्याला उत्तरोत्तर जास्ती प्रामाणिक, खरा, निष्ठावान आणि दुसऱ्यांना मदद करणारा बनवू इच्छितो. मुख्य ईशसंदेश होता, ईशदूत नव्हे. कुरआनच्या अंतिम संदेशानंतर नवीन संदेश किंवा ईशदूताची गरज नव्हती. अंतिम ईशदूत मुहम्मद (स.) यांच्यानंतर ईशदूत येण्याचा क्रम खंडीत झाला. मानवाच्या मार्गदर्शनासाठी कुरआन आहेच तो ईश्वराच्या संरक्षणात आहे त्याला बदलणे शक्य नाही.

सर्व दिव्य धर्मांच्या विषय मनुष्यप्राणी आहे. त्यात ईश्वराने मानवाबद्दल एक व्यवस्था सांगितली आहे मानवाची उत्पत्ती कायमसाठी केली हे त्याचे जीवन दोन

भागात वाटले आहे-

१) मृत्यूपूर्वीचा काळ (तो तात्पुरता आहे मानवाच्या परीक्षेचा तो काळ आहे).

२) मृत्यूनंतरचा काळ (तो कायम राहणारा आणि जगातील चांगल्या-वाईट कर्माच्या बदल्यात स्वर्ग-नरकाचा तेथे मोबदला मिळतो.) दोघांमध्ये मृत्यू हा बदलाच्या सीमारेषेवर आहे.

सगळ्याच दैवी धर्मांचे मूळ एकच ईश्वर आहे. सत्य या साऱ्या धर्मांत असले तरी त्याचे प्रमाण वेगळे आहे. एखाद्या धर्मांत १० टक्के, एखाद्यात ३० टक्के, एखाद्यात ५० टक्के ... आज मानवाला असा धर्म हवा आहे ज्यात १०० टक्के सत्य असेल. प्रश्न असा उरतो की अमुक एका धर्मात १०० टक्के सत्य आहे हे कसे ओळखायचे?

यासाठी प्रत्येक धर्माच्या दोन बाजू तपासल्या पाहिजेत.

१) ऐतिहासिक विश्वासर्हता (Historic Credibitity) म्हणजे धर्म ज्या भाषेत अवतरित झाला असेल, जे शिक्षण त्यातून मिळत असेल ते आजही त्याच स्वरूपात मिळत असले पाहिजे. २) त्या धर्माची शिकवण (Teaching) मानवी स्वभावाशी जुळणारी असावी. मानवाला उत्पन्न करणारा आणि धर्म देणारा ईश्वर एकच आहे आपण त्याला प्रभू, अल्लाह, खुदा, गॉड असे म्हणतो.

'धर्म' शब्दाचा अर्थ आहे वाट, रस्ता. ही वाट मनुष्याला त्याच्या सृष्ट्यापर्यंत पोहचवते. धर्माला इंग्रजीत (Religion) म्हणतात. हा शब्द Religars ने बनला आहे याचा अर्थ आहे बांधणे.... मनुष्य आणि सृष्टा यांना एका नात्यात बांधतो तो धर्म. धर्माच्या जवळजवळ दहा हजार व्याख्या आहेत, परंतु थोडक्यात स्वत:ची ओळख ही धर्माची सर्वांत चांगली व्याख्या आहे. धर्म मानवाला त्याच्या अस्तित्वाची ओळख करून देतो.

एखाद्या धर्माला विशुद्ध स्वरूपात समजून घ्यायचे असेल तर त्याला त्याच्या अनुयायांपासून वेगळा करून पाहिला पाहिजे. कारण ते कधी आपल्या धर्मालाच सत्य समजतात कधी नाही त्यानुसार वर्तन करतात तर कधी त्या शिकवणुकीचे अपूर्ण पालन करतात. धार्मिक संस्थेपासून, धार्मिक संस्कृतीपासून धर्माला वेगळे काढून पाहिले पाहिजे. धर्मामध्ये नसलेल्या गोष्टी संस्कृतीच्या प्रभावामुळे त्यात समाविष्ट केल्या जातात. आणि अनुयायी संस्कृतीलाच धर्म समजू लागतात.

बरेच लोक एखाद्या धर्माला समजून घेण्यासाठी त्या धर्माला मानणाऱ्या लोकांचे वागणे पाहतात आणि ठरवितात की धर्मात परिवर्तन करायला हवे. कोणत्याही धर्माच्या अभ्यासाची खरी पद्धत म्हणजे त्या धर्माच्या मूळ आधाराचा अभ्यास करूनच त्यात

बदल घडवावा की नाही हे ठरवावे. तेव्हा आपल्या लक्षात येईल की धर्माच्या अनुयायांत बदल आवश्यक आहे धर्मात नव्हे.

धर्म मानवसाठी प्रकाश असतो. मार्गदर्शन असते ते. प्रकाश, बरे, वाईट, चूक, बरोबर यातील फरक दाखवितो. जर कोणी उजेडात खड्डा बघूनही त्यात पडू इच्छित असेल तर उजेड त्याला अडवीत नाही. तसेच जर एखाद्या धार्मिक मार्गदर्शनाला मानत नसेल तर चूक त्याची आहे. धर्माची नव्हे. मानवी जीवनात धर्माला महत्त्व येण्याचे एक मोठे कारण मृत्यू आहे. मनुष्य मृत्यूमुळे ईश्वराकडे वळतो. मनुष्य आणि ईश्वर यांचे नाते धर्मामुळे आहे. या नात्यात महत्त्वाचे म्हणजे ईश्वर स्वतः काय सांगतो? मनुष्य ईश्वराबद्दल काय सांगतोय हे महत्त्वाचे नाही. खंत याबद्दल वाटते की, आजकाल ईश्वराबद्दल मनुष्य काय सांगतो याला महत्त्व दिले जाऊ लागले आहे. ईश्वराबद्दल दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत- ईश्वराची परवानगी आणि ईश्वराचा आनंद. चांगले किंवा वाईट कर्म ईश्वराच्या परवानगीनेच होते. हृदयाचे धडधडणे व नाडीचे ठोके पडणे, मेंदूचे कार्य बंद पडणे यात मनुष्य काहीच चांगले किवा वाईट बदल घडवू शकत नाही. तो कोणाला मदत करू शकत नाही किंवा त्रास ही देऊ शकत नाही.

आज जगात अनेक धर्म दिसतात, त्याचे कारण ईश्वराने माणसाला कर्म करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे, कारण कर्म केल्याशिवाय माणसाची परीक्षा होत नाही. सत्यमार्ग किंवा असत्य मार्गावर चालल्याशिवाय त्याची परीक्षा होत नाही. तो ईश्वराच्या खूश किंवा नाराज असण्याशिवाय अजाण आहे. परंतु खरे तर ज्याला ईश्वराला खुशी मिळते तो यशस्वी होईल, म्हणजे जो ईश्वराला प्रसन्न करणारे कर्म करतो तो यशस्वी होतो. ईश्वराची प्रसन्नता मनुष्याला इहलौकिक आणि पारलौकिक जीवनात यश देते. विविध धर्मांच्या प्रगतीने आपण फसता कामा नये. ईश्वराने जगाला माणसाचे परीक्षास्थळ बनविले आहे, यासाठी त्याने मनुष्याला बरेवाईट वागण्याचे स्वातंत्र्य दिले आहे.

जगात दोन प्रकारचे धर्म आहेत-

१. ते धर्म ज्यांची तत्त्वे मनुष्याच्या ज्ञान व अनुभवावर आधारित आहेत.

२. ते धर्म ज्यांची शिकवण ईश्वराने माणसाला दिली आहे.

सर्व धर्मांचा पाया जर ईश्वर मानला तर समाजात ऐक्याचा संभव अधिक वाढतो. हे ऐक्य दोन प्रकारचे असते- (१) स्वाभाविक ऐक्य, (२) अस्वाभाविक ऐक्य.

स्वाभाविक ऐक्य म्हणजे इतर मतभेद असूनसुद्धा निर्माण होऊ शकते, कारण मतभेद सहन करणे आणि त्यांचा आदर करणे योग्य आहे, पण मतभेदाचे अनुकरण चूक आहे.

अस्वाभाविक ऐक्य सांगते की सर्वांनी एकसारखा विचार करावा, एकसारखे अनुभवावे, एकसारखे काम करावे, एकसारखे बोलावे. ही गोष्ट संभवनीय नाही. त्यामुळे असे ऐक्य निर्माण होऊ शकत नाही.

धर्म : एक

बरेच लोक म्हणतात की सर्वच धर्म सारखे आहेत आणि सर्व धर्म एकच आहेत. ही गोष्ट मान्य केली तर त्याचे दोन परिणाम होतील,

१. ईश्वर बेकार कामे करतो. त्याने मनुष्याला एक धर्म दिला, मग दुसरा.. मग तिसरा... मग चौथा....

२. ईश्वर माणसामाणसांत भांडण लावतो. जैन लोकांना सांगतो, मांसाहार करू नका तर मुस्लिमांना सांगतो मांसाहार करा.

सर्व धर्म वेगवेगळे आहेत हे वास्तव आहे. मात्र सर्व दैवी धर्मांचे मूळ एक ईश्वर आहे. म्हणून सर्व धर्मांत काही गोष्टी समान दिसतात. उदाहरणार्थ- सर्व धर्म सांगतात की खोटे बोलू नका, ज्येष्ठांना आदराने वागवा, लहानांशी प्रेमाने वागा, प्रामाणिकपणे वागा, न्यायाने, शांततेने जगा इ.

आज अस्तित्वात असलेले सर्व धर्म वेगवेगळे आहेत, ते सर्व धर्म एक असते तर सर्वांचेच पालन करता आले असते. सर्व धर्मांच्या तत्त्वाचे पालन एकाच वेळी करणे मनुष्याला शक्य नाही. हिंदू धर्माला घटस्फोट मान्य नाही, पण मुस्लिम धर्म घटस्फोट मान्य करतो. कॅथलिक ख्रिश्चन धर्मात धर्मगुरूला लग्नाची परवानगी नाही. इस्लाम प्रत्येकाने लग्न करावे म्हणतो. हिंदू धर्मात संपत्ती (लक्ष्मी) ची पूजा होते, पण ख्रिश्चन धर्मात संपत्तीला वाईट म्हटले आहे. जैन धर्मात दिगंबर (नग्न) राहणे चांगले मानले जाते, तर इस्लाम शरीर पूर्ण झाकून घेण्यावर विश्वास ठेवतो. बौद्ध धर्मात सर्वसंग परित्याग करून संन्यास घेण्याला मोठे पुण्य समजतो, तर इस्लाम इहलोकातील साऱ्या जबाबदाऱ्या निभावण्याला मोठे पुण्य मानतो. जैन धर्मात मुनींनी खाणे-पिणे सोडून मरण स्वीकारणे (सल्लेखना घेणे) सर्वोत्तम समजले गेले आहे, तर दुसरीकडे इस्लाममध्ये आत्महत्या निषिद्ध ठरविली गेली आहे. शिख धर्म डोके आणि डोक्याचे सारे केस काढून मुंडन करावे असे म्हटले आहे.

विविध धर्मांना दोन भागांत विभागता येईल-

अ) सुरक्षित धर्म (Preserved Religion)

ब) असुरक्षित धर्म (Non Preserved Religion)

सुरक्षित धर्म म्हणजे ज्यात दैवी स्वरूपात उतरलेला धर्म, जो आजदेखील त्याच स्वरूपात दिसतो. असुरक्षित धर्म म्हणजे ज्यात ईशआदेशात बदल केले गेले

किंवा त्याला विसरले गेले. आज जगात इस्लाम हा एकमेव सुरक्षित धर्म आहे कारण चौदाशे वर्षांपूर्वी ईशधर्म ज्या स्वरूपात अवतरित झाला, ज्या भाषेत अवतरला त्याच स्वरूपात आणि त्याच भाषेत आढळतो. ईश्वराने मानवाला मृत्यूपूर्वी आणि मृत्यूनंतरच्या जीवनात सफल होण्यासाठी एकच धर्म दिला होता. पहिले पैगंबर आदम (अ.) यांनी त्याच धर्माची शिकवण दिली. ईश्वर एकच आहे. हे जग परीक्षेचे ठिकाण असून, मृत्यूनंतर या जगात केलेल्या चांगल्या-वाईट कर्मांचा मोबदला मिळेल. पैगंबर आदम (अ.) यांच्या मृत्यूनंतर लोकांनी त्यात बदल केले त्यामुळे दुसऱ्या पैगंबराने येऊन धर्माला विशुद्ध रूपात प्रस्तुत करण्याची गरज निर्माण झाली.

जुन्या काळात दळणवळणाची साधने, वाहने आणि संपर्काची साधने फारच कमी होती, त्यामुळे एका विभागासाठी एक पैगंबर तर दुसऱ्या विभागासाठी दुसरा पैगंबर. असा क्रम चालू राहिला तो थेट अंतिम पैगंबर मुहम्मद (स.) आले. त्यांनी पूर्वीचे पैगंबर जो धर्म सांगत होते त्याच धर्माची शिकवण दिली.

सर्व पैगंबरांनी खरे तर एकच शिकवण दिली. पण पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या शिकवणुकीत हा फरक होता की स्वत: ईश्वराने मुहम्मद (स.) यांनी सांगितलेल्या धर्माच्या संरक्षणाची जबाबदारी घेतली. इतर पैगंबरांच्या शिकवणुकीची जबाबदारी मनुष्यांवर होती, पण त्यांनी धर्माचे रक्षण न करता त्याला भ्रष्ट केले. सर्व पैगंबरांचा उपदेश एकच होता त्यामुळे सर्वांना समानरूपाने मानावे अशी घोषणा या प्रकारे केली गेली,

"म्हणा, आम्ही अल्लाह आणि त्याच्या शिकवणुकीला मानतो, जी आमच्यासाठी अवतरित झाली आहे. इब्राहीम, इस्माईल, इसहाक, याकूब (अ.) आणि त्यांची संतती यांच्यावर अवतरलेल्या शिकवणुकीस आम्ही मानतो. मूसा, इसा (अ.) आणि इतर पैगंबरांना ईश्वराने दिलेल्या आदेशांवरदेखील आमची श्रद्धा आहे. आम्ही त्यात भेद मानत नाही, आम्ही अल्लाहचे आज्ञाधारक (मुस्लिम) आहोत."

(कुरआन, ३:८१)

सर्व पैगंबरांच्या शिकवणुकीचा मूळ आधार तौहीद म्हणजे एकेश्वरत्व होता. मनुष्याची बुद्धीदेखील या गोष्टीला मान्यता देते की ईश्वर आहे आणि तो एक आहे. जर अनेक ईश्वर असते तर ते सर्वजण आपल्या मर्जीनुसार काम करीत राहिले असते आणि त्यांच्यात वाद व युद्ध झाले असते. हरणारा तो ईश्वर म्हणवला न जाता जिंकणाऱ्यास ईश्वर म्हटले गेले असते. निरनिराळे ईश्वर एकच काम न करता वेगवेगळी कामे करतात. कोणी हवेचा ईश्वर तर कोणी आगीचा, तर कोणी पाण्याचा ईश्वर झाला असता. एका कामासाठी अनेक ईश्वर लागले असते. उदाहरणार्थ- भोजन बनविण्यासाठी मनुष्याला अग्निचा ईश्वर, पाण्याचा, हवेचा, लाकडाचा, जमिनीचा ईश्वर याची गरज

पडली असती. या सर्व ईश्वरांना देवांनी राजी करावे लागले असते. एखादा रुसला तरी काम पूर्ण झाले नसते.

एक ईश्वर उभे राहून त्याला नमस्कार करण्याने खूश झाला असता तर दुसरा साष्टांग दंडवत म्हणजे आडवे पडून नमस्कार करण्याने. मनुष्याचे सारे आयुष्य अशा देवांना म्हणजेच ईश्वरांना खूश करण्यातच गेले असते. एखादा त्यांच्यावर रागावला तर त्याने मनुष्याला ठार मारले असते आणि त्याला जिवंत राहायची संधीच मिळाली नसती. याशिवाय एक ईश्वर दुसऱ्या ईश्वराच्या कामांबद्दल, जबाबदाऱ्यांबद्दल अनभिज्ञ असता किंवा नसता तर हे त्याचे देवत्व हे अपूर्ण राहिले असते.

अशा परिस्थितीत ब्रह्मांडाचे संचलन शक्य झाले असते का? ईश्वराला सर्व वस्तुभागाचे व बाबींचे ज्ञान असायला नको का? प्रत्येक कणावर ईश्वराला अधिकार नको का? ईश्वराला अर्धी कामे करून चालेल का? बहुदेववाद मानणाऱ्यांनी या बाबींचा विचार करायला हवा.

अनेक देव असते तर एकाने मनुष्याचा एक भाग बनविला असता तर दुसऱ्याने ब्रह्मांडाचा एक भाग. हे सर्व भाग वेगवेगळ्या देवाचे आदेश मानू लागले असते, ब्रह्मांड आणि मनुष्य यांच्यात विरोध किंवा विस्कटलेपण आले असते. पण आज काय दिसते? मनुष्याचे सर्व अवयव फक्त मेंदूचे आदेश मानतात आणि पूर्ण ब्रह्मांडात संतुलन दिसते आहे.

काही जण तोंडाने म्हणतात, "आम्ही एकेश्वरत्व मानतो" आणि प्रत्यक्षात अनेक देवांपुढे वाकतात सर्वांना मानतात. जेव्हा मानण्यात आणि वागण्यात फरक आढळतो तेव्हा त्या वागण्यालाच सत्य मानले जाते.

हिंदू धर्मात ईश्वराचे स्वरूप

हिंदू मताप्रमाणे अदृष्ट सर्वांहून वेगळा एक ईश्वर मानला आहे. इस्लामप्रमाणेच अनादि ईश्वर मानला गेला आहे. हिंदूंचा मूळ ग्रंथ वेद केवळ एका ईश्वराची उपासना करण्याचा आदेश देतो, उदाहरणार्थ–

- तो केवळ एक आहे, कोणा दुसऱ्याविना. (छांदोग्योपनिषद ६:२:१)
- ईश्वर फक्त एक आहे, दुसरा कोणी नाही मुळीच नाही. किंचितही नाही. (ब्रह्मसूत्रभाष्य शंकराचार्य)
- ईश्वरा नि:संशय तू महान आहेस. (अथर्व २०:५८:३)
- त्याचे आई-बाप ईश्वर कोणी नाहीत. (श्वेताश्वतोपरिषद ६:२)
- त्याची कोठेही मूर्ती नाही. (श्वेताश्वतोपरिषद ६:२)

• तो विशुद्ध आहे त्याला शरीर नाही. (यजुर्वेद ४०:८)

• त्याची कोणतीही उपमा देता येत नाही. (यजुर्वेद ३२:३)

• त्याचे कोणतेही रूप दिसत नाही. नुसत्या डोळ्यांनी त्याला पाहता येत नाही. जे त्याला मन आणि मस्तकाने पाहतात, त्यांच्या मनात प्रवेश करून तो त्यांना अमर करतो. (श्वेताश्वतोपनिषद ४:२०)

• मित्रांनो त्याच्याशिवाय कोणाचीही उपासना करू नका केवळ तोच एक ईश्वर आहे. (ऋग्वेद ८:१:१)

• जे नैसर्गिक (हवा, पाणी, चंद्र, सूर्य, अग्नि, झाड) यांची पूजा करतील ते अंधारात खितपत पडतील. जे बनविलेल्या वस्तू (संभूति) मूर्ती वगैरेंची पूजा करतील ते आणखीन खोल अंधारात बुडतील. (यजुर्वेद ४०:९)

इस्लाममध्ये ईश्वराचे स्वरूप

• म्हणा, अल्लाह त्याच्यासारखाच आहे, अल्लाह निरपेक्ष व सर्वांचा आधार आहे. तो कोणाला जन्म देत नाही. त्याला कोणी जन्म देत नाही. त्याच्या समकक्ष कोणीही नाही. (कुरआन, ११२:१:४)

• जर दोघां (आकाश व पृथ्वी) त अल्लाहशिवाय कोणी इष्ट किंवा पूज्य असता तर पृथ्वी व आकाशाची व्यवस्था (संतुलन) बिघडली असती. (कुरआन, २१:२२)

• अल्लाहने आपला कोणी पुत्र निर्माण केला नाही. त्याच्या व्यतिरिक्त कोणी पूज्य-प्रभू नाही. जर असे असते तर प्रत्येक प्रभू आपल्या सृष्टीसह वेगळा झाला असता आणि मग ते एकमेकांवर कुरघोडी करीत राहिले असते. (कुरआन, २३:९१)

• त्या (अल्लाह) सारखी कोणतीही वस्तू नाही. (कुरआन, ४२:११)

• हा अल्लाह ज्याच्यात उपरोक्त गुण आहेत तुमचा ईश्वर आहे त्याच्याशिवाय कोणी पूज्य नाही, तो प्रत्येक वस्तूचा दृष्टा आहे म्हणून तुम्ही त्याचे भक्त व्हा. तो प्रत्येक गोष्टीचा जबाबदार आहे. त्याला आपली दृष्टी पाहू शकत नाही, परंतु तो दृष्टीला मिळवू शकतो. (कुरआन, ६:१०२-१०३)

गौतम बुद्धाला मानणारे बौद्ध, महाविराला मानणारे जैन, यहुदी कबिल्यातील यहुदी, सिंधू नदीच्या किनाऱ्यावर राहणारे सिंधू (नंतर त्यांना हिंदू म्हटले जाऊ लागले) म्हणवले जातात. पण मुहम्मद (स.) यांना मानणारे, मुहम्मडन म्हणवत नाहीत. कारण इस्लाम धर्म कोणा माणसाने बनविला नाही तर तो साक्षात सृष्टाने दिलेला धर्म आहे.

इस्लाम अरबी भाषेचा शब्द 'सलम'ने बनतो. त्याचा अर्थ आहे 'अमन' (शांती).

हा शब्द 'सिल्म'पासून बनला आहे त्याचा अर्थ आहे, आपल्या इच्छेला अल्लाहच्या स्वाधीन करणे. अशा रीतीने इस्लामची व्याख्या आपल्या इच्छेला अल्लाहच्या ताब्यात देऊन (इहलोक व परलोकात) शांती प्राप्त करणे अशी होते.

इस्लाम हे नावदेखील स्वत: ईश्वराने दिले आहे. मानवमात्रांसाठी स्वत: सृष्टाने दिलेला हा धर्म आहे. मानवाला जीवनयापन, जगण्याची एक जीवनपद्धतीविषयी सृष्टाने दिलेले हे मार्गदर्शन आहे.

ईश्वराने जगातील सर्व धर्मांत त्यांच्या भाषेतले पैगंबर पाठविले. सर्वांनी लोकांना एकाच धर्माकडे बोलाविले. इस्लाम या नावातच संपूर्णता आहे. जगभरात ईश्वरप्रणित पद्धतीने इस्लामने ईश्वराचे आज्ञापालन केले. ईश्वरप्रणित पद्धत म्हणजे आदम (अ.) पासून मुहम्मद (स.) पर्यंतच्या पैगंबरांनी अनुसरलेली पद्धत होय.

इस्लाम साऱ्या ब्रह्मांडाचा धर्म आहे. कारण ब्रह्मांडातील प्रत्येक वस्तू ईश्वराचे आज्ञापालन करीत आहे. मनुष्यदेखील ईश्वराच्या आज्ञांचे पालन करीत आहे. परंतु हे आज्ञापालन नाईलाजास्तव तो करतो आहे. उदाहरणार्थ- मनुष्यप्राण्यावर प्रश्न विचारता येतात त्यांना आव्हान देता येते, त्यात बदलही करता येतात.

मुस्लिम होणे म्हणजे स्वत:ला बदलावे लागते. जेव्हा व्यक्ती इस्लाम स्वीकारते तेव्हा तिला श्रद्धा, एकेश्वरत्व, परलोकत्व, ईशदूतत्व मानावे लागते. उपासना- नमाज, रोजा, जकात, हज या रितीने करावी लागते. शिवाय स्वत:बद्दलची, आई-वडील, नातेवाईक, शेजारी, मुस्लिम व इतर धर्मीय लोक, सजीव, निर्जीव वस्तूंबाबतची कर्तव्ये पार पाडावी लागतात.

इस्लाम वागणुकीवर (Pratice based Religion) आधारित धर्म आहे. एखाद्याचे केवळ नाव मुस्लिम ठेवण्याने तो मुस्लिम होत नाही.

"आता काय हे लोक इस्लामशिवाय अन्य धर्म स्वीकारू इच्छितात? खरे तर आकाश आणि पृथ्वी यांच्या मध्ये जो कोण आहे तो स्वेच्छेने किंवा नाइलाजाने त्याच्या पुढे झुकला आहे आणि सर्वांना त्याच्याकडे परत जायचे आहे." (कुरआन, ३:८३)

"इस्लामशिवाय अन्य धर्म जो स्वीकारेल त्याच्याकडून काहीही स्वीकारले जाणार नाही. मृत्यूनंतरच्या जीवनात (हश्र) त्याचे फारच नुकसान होईल."

(कुरआन, ३:८३)

सर्व ईशभक्तांना कुरआनकडून मिळणारे मार्गदर्शन हे ईश्वराकडून आहे आणि तो दुसऱ्यांकडून काही स्वीकारणार नाही हे सांगून मुस्लिमांना जबाबदार बनविले गेले आहे. हे मार्गदर्शन न मानणाऱ्यांवरही एक जबाबदारी टाकली गेलीय की त्यांनी एकदा इस्लामला समजून घ्यावे त्याला मानणे न मानणे याबद्दल त्याला स्वातंत्र्य आहे.

सर्वधर्मसमभाव आणि इस्लाम धर्म

-मुहम्मद इकबाल मुल्ला

सत्यधर्मचा निष्कर्ष

धर्माच्या बाबतीत जेव्हा चर्चा होते तेव्हा सर्वसाधारणपणे असे नक्कीच म्हटले जाते की सगळेच धर्म सत्य आहेत. एक धर्म सत्य आणि दुसरा सत्य नाही असे म्हणता येत नाही. म्हणून असे म्हटले जाते की, धर्माची नावे वेगवेगळी असली तरी सर्वांचे अंतिम ध्येय एकच आहे. यातील कोणत्याही एका रस्त्याने- धर्माने जाऊन मानव आपले ध्येय प्राप्त करून घेऊ शकतो. सर्व धर्म सत्य आहेत तर मग एखाद्या धर्माला सत्य दुसऱ्याला चुकीचा म्हणता येत नाही.

एखादी व्यक्ती एका धर्मानुसार आचरण करते तेव्हा तिला तसे करू द्यावे. तिने दुसऱ्यांनाही त्याच्या आवडीच्या धर्मानुसार वागण्याचे अधिकार द्यावेत व सर्वांनाच आपापल्या धर्ममार्गाने जाऊन मोक्ष मिळेल अशी श्रद्धा ठेवावी. म्हणूनच कोणा एका धर्माने जाऊनच मोक्ष मिळतो तेव्हा तोच सत्यधर्म असे म्हणणे समाजात मतभेद आणि अशांती पसरविण्यासारखे आहे. यामुळे राष्ट्रीय ऐक्याला धक्का बसेल आणि लोक एकमेकांचा द्वेष करतील व त्यांच्यात दुरावा निर्माण होईल.

ज्यांचा वरीलप्रमाणे दृष्टिकोन आहे त्यांनी धर्मांचा खोलवर आणि गांभीर्याने विचार केलेला नाही. हा ढोबळ आणि वरवरचा चिंतनाचा परिणाम आहे. खरे तर धर्मावरून परस्पर भांडणे चुकीचीच आहेत. धार्मिक लोकांच्यात परस्पर आदर, प्रेम, सहानुभूती आणि बंधुत्वाची भावना असली पाहिजे.

जेथे बहुसांस्कृतिक समाज आहे, जेथे अनेक धर्मांचे लोक राहात असतील, तेथे धर्माच्या नावावर द्वेष आणि तिरस्कार असेल तर ते विनाशकारीच ठरेल. मानव समाज, राष्ट्रीय ऐक्य आणि अखंडता यासाठीदेखील हे योग्य ठरणार नाही.

बुद्धी, तर्क, विवेक यांच्या आधारे सर्व धर्मांचा अभ्यास न करतादेखील जर पूर्वग्रहांचा त्याग करून सर्व धर्मांचा निष्पक्ष तुलनात्मक अभ्यास केला तर कोणते सत्य समोर येते? त्याचा स्वीकार करणे इतके सोपे नाही. सर्व धर्माच्या लोकांमध्ये परस्पर बंधुभाव, राष्ट्रीय ऐक्य, धार्मिक औदार्य येण्यासाठी पुढील गोष्टी आवश्यक आहेत.

प्रत्येकाला श्रद्धा आणि धर्माच्या निवडीचे स्वातंत्र्य असावे.

धर्माच्या आधारावर कोणाशीही भेदभावाने वागू नये. स्वतःच्या धर्माव्यतिरिक्त दुसऱ्या धार्मबद्दल ही आदरसन्मान आणि औदार्याची भावना ठेवावी.

एक मूळ प्रश्न

सर्वच धर्म सत्य आहेत का? मानवजातीच्या मार्गदर्शनासाठी ईश्वराने मानवाच्या उत्पत्तीकाळापासून एकच धर्म दिला आहे का? या प्रश्नाचा संबंध केवळ ज्ञान आणि तत्त्वज्ञानाशीच नव्हे तर मानवाच्या इहलौकिक जीवनाशी तसेच मृत्यूनंतरच्या जीवनातील मोक्षप्राप्तीशीदेखील आहे. समजा, एखाद्याने ईश्वरप्रदत्त धर्माला सोडून आपल्या मनपसंत धर्मानुसार किंवा पूर्वजांचा धर्मानुसार आयुष्यभर आचरण केले आणि मृत्यूनंतरच्या जीवनात त्याला कळाले की ईश्वराचे आदेश आणि मार्गदर्शनापासून तो जगातील जीवनात वंचित राहिला आहे, आता त्याला अपयश आणि नरकयातनांना सामोरे जावे लागले तर त्या वेळी काय होईल? धार्मिक ऐक्याशी संबंधित अशीही समस्या नाही. प्रत्येकाने आपली आवड बाजूला ठेवून ईशइच्छा आणि त्याला आवडणाऱ्या मार्गाचा शोध घ्यायला हवा. मानव विचार करू शकतो आणि आपल्या हिताचा निर्णय घेऊ शकतो. सत्यनिष्ठेसाठी बलिदान द्यावे लागले तरी चालेल, पण मृत्यूनंतर दुसऱ्या जगात जेव्हा विचार करण्याची व आपल्या हिताचा मार्ग निवडायची संधी मिळणार नाही. आयुष्य हे एकदाच मिळते, म्हणून योग्य निर्णय घ्यायची संधी आपल्याला मिळते ती गमावणे शहाणपणाचे नाही.

एक गोष्ट स्पष्ट करायला हवी की वाचकांना या लेखाच्या माध्यमातून सर्व धर्माच्या मूळ प्रश्नावर विचार करण्याचे आमंत्रण देणे हा उद्देश आहे. त्यासाठी येथे तुलनात्मक आणि वस्तुनिष्ठ अभ्यास येथे केला आहे. या लेखाचा उद्देश कोणत्याही धर्माचा अपमान आणि निंदा करणे हा नाही तर सर्व धर्मांच्या मूळ धारणांचा तुलनात्मक आणि निरपेक्ष अभ्यास करून सत्य समाजापुढे ठेवणे.

जर एखादा धर्म आपणच सत्य आहोत म्हणत असेल तर त्याचे हे मत ज्ञान, बुद्धी आणि तर्काच्या आधारावर पारखून घेतले पाहिजे. पूर्वग्रह, पक्षपात, पूर्वजांचे अंधानुकरण यातून मुक्त होऊन सत्याचा स्वीकार करायला पाहिजे. या लेखाचा हेतू कोणा धर्माला श्रेष्ठ किंवा तुच्छ सिद्ध करणे नसून सर्व धर्मांबद्दल आदर दाखविणेदेखील आहे.

एक विरोधाभास

धर्माची व्याख्या देताना काही विद्वानांनी पुढील विचार व्यक्त केले आहेत त्यापैकी काहीजण सर्वधर्मसमभावाचे समर्थक आहेत.

धर्म हा मानवाच्या आध्यात्मिक अनुभवाचा विषय आहे.

धर्म सत्याचा शोध आहे.

धर्म परमसत्य किंवा शाश्वत सत्य (ultimate reality Eternal truth and supreme Reality) प्राप्त करण्याच्या मानवाच्या प्रयत्नाचे नाव आहे.

जणू काही ईशइच्छेचे ज्ञान ईश्वराचे संदेश आणि त्याचे प्रतिनिधी पैगंबर यांच्या शिवायच होते, अशा चिंतनाने मानवाला ईशमार्गदर्शन प्राप्त तरी होऊ शकते काय? याद्वारे श्रद्धा, उपासना, नैतिकता जीवनव्यवस्था इत्यादींचे नियम बनविता येतील का? कितीही प्रयत्न केला तरी ईश्वराशिवाय हे कोणीही करू शकणार नाही. सत्य शोधण्याच्या प्रयत्नात मानवाला वेगवेगळे निष्कर्ष मिळतील आणि सत्य-असत्य ठरविण्याचा मानदंड सापडणार नाही.

बरेच जण असे समजतात की धर्म म्हणजे काय? तर धर्म म्हणजे व्यक्तिगत जीवनात ईश्वराचे स्मरण, पूजापाठ, भक्ती इ. नियमांचे, नैतिकतेचे पालन करणे होय. पण या विचारामुळे व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनात ईश्वरालाच दूर ठेवले गेले आहे. ईश्वराच्या मार्गदर्शनाला विरोध करून लोक आपापल्या दृष्टिकोनानुसार जीवन जगताहेत. स्पष्ट आहे की अशा संकुचित, सीमित धर्माची गरजच नाही.

काही महत्त्वाचे प्रश्न

१) ईश्वराने माणसाला धर्मासाठी आध्यात्मिक साधना करायला सांगितले आहे का? शाश्वत सत्यासाठी प्रयत्न केल्याने ईश्वर खूश होणार आहे का? ईश्वराने मानवाला धर्म प्रदान करण्यात सामर्थ्यहीनता दाखविली आहे का?

२) जगात सर्वांत आधी आदम (अ.) आणि त्यांची पत्नी हव्वा (अ.) अवतरले. त्यांनी स्वत: धर्म बनविला का?

३) धर्म बनवायची जबाबदारी कोणावर आहे? मानव जर स्वत: धर्म बनवू शकला तर मग ईश्वराची गरजच काय? मानवनिर्मित धर्मात ईश्वराची धारणा अनुस्यूत नाही का?

४) ईश्वराने विविध धर्मांत मतभेद असूनसुद्धा सर्व धर्म सत्य असल्याचा निर्वाळा दिला आहे का? ईश्वराने कोणत्यातरी एका विशिष्ट धर्माला शाश्वत सत्य मानले आहे का?

५) मानवजातीच्या इतिहासात या गोष्टीची नोंद आहे की विभिन्न जातीत व विभिन्न काळात असे पवित्र, चारित्र्यवान व्यक्ती झाल्या ज्यांनी स्वत:ला पैगंबर, ईशदूत म्हणवले. त्यांनी ईश्वराबद्दल व मृत्यूनंतरच्या जीवनाबद्दल स्वर्ग-नरक, इहलोक-परलोक येथील सफलता व मोक्षाबाबतची माहिती स्वच्छ शब्दांत सांगितली आहे. त्या सच्चरित्र लोकांनी हे ही स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की हे संदेश व शिक्षण ईश्वराकडून आले आहेत, त्यांनी स्वत:हून सांगितले नाही. या पैगंबरांनी ईशमार्गदर्शनाप्रमाणे स्वत: आचरण करून या धर्मशिक्षणाचा व्यावहारिक आदर्श समाजापुढे ठेवला आहे. हे पैगंबर विभिन्न काळांत व विभिन्न देशांत येत राहिले.

एक हजार चारशे पन्नास (१४५०) वर्षांपूर्वी अरबस्थानात पैगंबर मुहम्मद (स.) आले. नंतर पैगंबर येण्याचा क्रम खंडित झाला. म्हणून हजरत मुहम्मद (स.) ईश्वराचे अंतिम दूत आहेत. या सर्व पैगंबरांच्या मार्गदर्शनात काही तफावत व विरोध दिसून येत नाही. हे सर्वजण नि:स्वार्थी भावनेने मानवजातीच्या कल्याणासाठी व मुक्तीसाठी प्रयत्न करीत राहिले. या पवित्र लोकांना ईश्वराकडून संदेश व मार्गदर्शन जिब्रिल (अ.) नावाच्या देवदूताकडून वह्य म्हणजेच प्रकाशनाच्या रूपात मिळू लागले.

आपल्याला चांगलेच माहीत आहे की जीवनासाठी मार्गदर्शन मानवाची मूलभूत गरज आहे. मग आपली सर्वोत्तम निर्मिती मानव त्याच्या मूळ गरजेबद्दल ईश्वर त्याच्या मूळ गरजेविषयी काहीच व्यवस्था न करण्याइतका निर्दयी असेल का? मुळीच नाही. याउलट त्याने मानवाच्या उपदेशाची आणि मार्गदर्शनाची पूर्ण व्यवस्था केली आहे.

विभिन्न धर्मातील समान तत्त्वे

धर्माधर्मांत इतके मतभेद, विरोधाभास आणि फरक दिसतात की त्याकडे दुर्लक्ष करता येत नाही. तसेच विभिन्न धर्मांत ईशधारणा, नैतिक मूल्ये आणि काही दृष्टिकोनांबाबत साम्य आढळते. व्यावहारिक रूपात धर्मांमध्ये विरोधाभास दिसत असल्याने धर्मातील सैद्धान्तिक समानतेचा पूल कोसळतो आणि धर्म पूर्णत: एक दुसऱ्याचा प्रतिकूल आणि विरोधी बनतात. नैतिक शिक्षण आणि इतर मूल्येदेखील विभिन्न धर्मात उभयनिष्ठ आहेत. या उभयनिष्ठ तत्त्वामुळे ज्या समान गोष्टी दिसतात. त्यातून एक सत्य समोर येते की मानवजातीच्या उत्पत्तीकाळात एकच धर्म होता. कालांतराने त्यात काही स्वार्थी तत्त्वांनी आपल्या स्वार्थासाठी त्या एका धर्मापासून अनेक धर्म निर्माण केले.

मानवाचा आद्य धर्म

मानव ईश्वराची सर्वाधिक महत्त्वपूर्ण आणि सर्वोत्तम निर्मिती आहे. ज्या ईश्वराने पक्ष्यांना उडण्याची कला आणि माश्यांना पोहण्याची कला दिली, त्याने मनुष्याला त्याच्या जीवनाबद्दल मार्गदर्शन दिले नसेल का? ज्याने ब्रह्मांड निर्माण केले, त्याने मानवाला नक्कीच मागदर्शन दिले असणार.

मनुष्य बुद्धिमान आहे. तो जेव्हा एखादी मशीन बनवितो तेव्हा तिच्या प्रयोगविधीबद्दल पुस्तिका अवश्य तयार करतो. ईश्वर जेव्हा मनुष्य बनवू शकतो तर त्याच्या जीवनाविषयी निर्देश पुस्तिका (Manual) बनविली नसेल काय? ही निर्देशिका (Manual) मानवाचा आद्य धर्म आहे. याची निर्मिती स्वत: जगतसृष्टा ईश्वराने केली आहे. या निर्देशिकेत सर्वशक्तिमान ईश्वराने माणसाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय

आणि धार्मिक जीवनाच्या संतुलित विकासाची सर्वोत्तम व्यवस्था केली आहे. याच्या आधारे मानव स्वत:मध्ये, आपल्या कुटुंब, समाज, देश आणि जगामध्ये सुधारणा करू शकतो. या निर्देशनानुसार जीवन व्यतीत करून सृष्टाला प्रसन्न करून इहलोक आणि परलोकातील जीवन सफल करू शकतो. अशा रितीने ईश्वराने सुरूवातीपासूनच मानवाला संपूर्ण जीवनासाठी सर्वोत्तम मार्गदर्शनाची व्यवस्था दिलेली आहे.

या धर्मात एकीकडे व्यक्ती, समाज यांच्या न्याय, शांतता, संरक्षण यांची गॅरंटी दिलेली आहे तर दुसरीकडे अत्याचार, अन्याय, शोषण, विकृतीरहित व शुद्ध जीवनाचे शिक्षण दिले गेले आहे. हा धर्म म्हणजे निर्मात्याप्रति मानवाच्या संपूर्ण समर्पणाची व्यवस्था होती.

विभिन्न धर्म आणि मूलभूत तत्त्वे

या तत्त्वांचा विचार केला तर सर्वधर्मसमभाव या तत्त्वाचे वास्तव लक्षात येते. सारे धर्म खरोखरच सत्य आहेत का? जर याचे उत्तर सकारात्मक असेल तर प्रश्न निर्माण होतो की मग धर्मांच्या मूळ तत्त्वात इतका भेद आणि विरोध का दिसतो? असे असुनसुद्धा धर्मांच्या एकत्वाचा स्वीकार करता येईल का? यावर गंभीर चिंतन आवश्यक आहे. या दृष्टीने सर्व धर्मांला विचार फारच व्यापक विषय होईल म्हणून काही धर्मांचाच विचार आपण करू.

विभिन्न धर्मातील मूलतत्त्वे पुढीलप्रमाणे आहेत- ईश्वराची कल्पना व ईश्वराचे अस्तित्व, सृष्टीची निर्मिती, मानवासाठी निर्देश आणि मार्गदर्शनाची व्यवस्था, मृत्यूनंतरचे जीवन (स्वर्ग आणि नरक).

हे विषय केवळ बौद्धिक, तात्त्विक चर्चेसाठी नाहीत. याचा संबंध मानव समाजाच्या व्यावहारिक जीवनातील यश आणि त्याच्या अंतिम परिणामाशी आहे. ईश्वराच्या धारणेसंबंधी विविध धर्मांची मते थोडक्यात पुढीलप्रमाणे आहेत-

हिंदू धर्म

हिंदू धर्मात ईश्वर आधी एक मानला गेला. नंतर दोन ईश्वर त्यात आणखी मिळाले आणि ईश्वर एकंदर तीन झाले. वेदांमध्ये एक ईश्वर आणि त्याच्या गुणांचा उल्लेख सापडतो. पुढे ही संख्या ३३ कोटी झाली. व्यावहारिक रूपात हिंदू खूप ईश्वरांची पूजा व उपासना करतात. त्यांच्या मते प्रत्येक गोष्टीत ईश्वर आहे. ब्रह्मांडाच्या प्रत्येक कणात भगवान आहे. पृथ्वीच्या कणाकणात ईश्वर आहे.

ख्रिस्ती धर्म

या धर्मात एक ईश्वर आहे. त्याचा पुत्र येशू (इसा अ.) आहे आणि एक पवित्र आत्माही होता- घोस्ट (Holy Ghost) आहे, यालाच त्रिईश्वरवाद (Faith of Trinity) असे म्हणतात. या त्रिईश्वरवादात मूलभूत श्रद्धेच्या रूपात एक कल्पना ही आहे, ती म्हणजे मोक्षासाठी येशूवर श्रद्धा ठेवणे. त्यांना ईश्वर व ईश्वराचा पुत्र मानणे आणि मानवाच्या पापाच्या प्रायश्चित्तासाठी त्यांना सुळावर चढविले जाणे हे सत्य मानणे.

बौद्ध धर्म

या धर्माने ईश्वराचा स्वीकार ही केला नाही व मनुष्याच्या निर्मितीत कोणत्याही पराभौतिक तत्त्वाला जबाबदार मानत नाही.

जैन धर्म

जैन धर्म मताप्रमाणे सृष्टी आणि मनुष्याच्या निर्मितीसाठी ईश्वराची गरज नाही. जैन मत ईश्वराला मानत नाही. तो तत्त्व आणि जीवाला चिरस्थायी मानतो. अशा प्रकारे बौद्धमत आणि जैनमत दोघेही ईश्वराचे अस्तित्व आणि त्याच्या धारणेपासून रिक्त (विरहीत) आहेत.

इस्लाम धर्म

इस्लाम मताप्रमाणे समस्त ब्रह्मांड व मनुष्याचा सृष्टा एक आणि केवळ एक ईश्वर आहे. ईश्वर एकमेव आणि पहिल्यापासून आहे आणि कायम राहणारे ते अस्तित्व आहे. त्याची कोणी पत्नी नाही, पुत्र किंवा कन्या नाही. त्याच्याकडे सर्वोत्तम गुण आहेत. तो कोणाचा मुखापेक्षी नाही. तो जगाचा सृष्टा, स्वामी, शासक व मार्गदर्शक आहे. त्याने आपले नियम मानवासाठी मार्गदर्शन पैगंबरद्वारे मानवाला दिले आहे.

कुरआन मानवाला सावध करतो अल्लाहने दिलेल्या मर्यादांचे उल्लंघन न करण्याची व मृत्यूनंतरच्या जीवनाची काळजी करण्याची ताकीत देतो. इहलोकातील कर्मानुसार पारलौकिक जीवनात फळ मिळते असे इस्लाम सांगतो.

ईश्वराच्या योग्यतेत कोणालाही, मग ते देवदूत असो की पूर्वज यांना भागीदार बनविणे म्हणजे शिर्क (बहुदेववाद) होय. इस्लाम मतात शिर्क महान पाप आहे. ईश्वरदेखील त्या पापाला क्षमा करीत नाही.

पवित्र कुरआनात म्हटले आहे,

"अल्लाह जवळ फक्त शिर्क (बहुदेववाद) च्या अपराधाला क्षमा नाही. इतर सर्व शिर्क (बहुदेववाद) च्या अपराधाला क्षमा नाही. इतर सर्व पापांना क्षमा मिळू शकते जर त्याच्या मनात आले तर ज्याने कोणाला अल्लाहचे भागीदार बनविले तर तो आपला मार्ग सोडून भटकत दूरवर गेला असे समजावे." (कुरआन, ४:११६)

शीख मताचे संस्थापक गुरू नानक होते. त्यांनी ईश्वराला ब्रहम, कबीर, सतनाम, अकाल (शाश्वत) अशा विविध नावाने पूजनीय म्हटले आहे. गुरु नानक यांच्यानंतर शीख साहित्यात 'वाहे गुरू' हा शब्द प्रयुक्त झाला. नानकजींनी अल्लाह, खुदा, परवदिगार, साहब, इ. शब्दांचा वापर केला आहे. त्यांनी पौराणिक भक्तीत वापरलेल्या राग, गोपाल, मुगरी, नारायण इ. नामांचाही वापर ईश्वरासाठी केला आहे.

यहुदी मतामध्ये एका ईश्वराची धारणा आहे. यहुदी जात ईश्वराबरोबर आपला विशेष संबंध आहे असे मानते. त्यांच्या धर्मग्रंथात हे लिहिलेले आहे की एकदा प्रसिद्ध पैगंबर याकूब (अ.) यांच्याबरोबर ईश्वर कुश्ती खेळला व तो हारला. यहुदी मतात मानले गेले आहे की यहुदी जात विशेष जात आहे. ईश्वराची ती आवडती जात आहे. जगात ती शासन व प्रशासन करण्यासाठी व परलोकात स्वर्गासाठी निर्माण झाली आहे. (मुत्ताला-ए-मजाहिब, पृ. १५०, १५१)

उपरोक्त विवेचनाने एक गोष्ट स्पष्ट होते की विभिन्न धर्मांत ईश्वराची कल्पना वेगवेगळी तर कधी परस्परविरोधी अशी आहे. अशा स्थितीत एकाच वेळी सर्व धर्मांतील ईश्वराची धारणा सत्य असू शकतात काय? दोन विरोधी गोष्टींत एक सत्य तर दुसरी असत्य असणारच. जर दोन्हींपैकी एकीस सत्य व इतर धारणांना असत्य म्हटले तर इतर धर्मांचा अपमान होईल. जर हट्टाने सर्व धर्मांना सत्य म्हटले तर जो ईश्वर नाही त्यालाही ईश्वर, पूज्य, प्रभू समजावे लागेल. जो ईश्वर नाही त्याला ईश्वर, सृष्टीचा निर्माता मानणे म्हणजे ईश्वराची अवज्ञा करणे होय. अशा आचरणाने मृत्यूनंतरच्या जीवनात मनुष्याला तेथे पुरस्काराऐवजी दंडच मिळेल ना?

सृष्टीची निर्मिती आणि विभिन्न धर्म

हिंदू धर्म

हिंदू धर्मात सृष्टी आणि सृष्टी निर्मितीबद्दल वेगवेगळी मते आढळतात. वेद, उपनिषदे, मनुस्मृती, पुराणे, आर्य समाज यांच्या कल्पना वेगळ्या आणि परस्परविरोधीसुद्धा आहेत.

डॉ. ताराचंद 'इन्फल्युअन्स ऑफ इस्लाम ऑन इंडियन कल्चर' या पुस्तकात म्हणतात,

"अनादि अनंत अस्तित्वाने पाणी निर्मिले त्यात एक सोनेरी अंडे तरंगत होते. त्यात त्याने प्रवेश केला व ब्रह्माच्या रूपात जन्मला. ब्रह्माने देव, स्वर्ग, पृथ्वी, आकाश, सूर्य, चंद्र, सृष्टी आणि मानवाला निर्मिले ही वैदिक कल्पना आहे."

(तखलीके कायनात और धर्म पृ.१,२)

स्वामी दयानन्द यांनी आपल्या 'सत्यार्थ प्रकाश' या पुस्तकात सृष्टी रचनेसंबंधी पौराणिक कल्पना उद्धृत केली आहे.

पाहा देवी भागवत पुराण श्री नामक एक देवी स्त्री जी श्रीपुरची स्वामिनी तिने साऱ्या जगाची निर्मिती केली आणि ब्रह्मा, विष्णु, शिव यांनाही तिनेच रचले. देवीला इच्छा झाली आणि तिने आपला हात घासला त्यामुळे त्या हाथावर फोड उठला त्यातून ब्रह्माची उत्पत्ती झाली. देवी त्याला म्हणाली, "तू माझ्याशी विवाह कर." ब्रह्मा म्हणाला, "तू माझी माता आहेस. मी तुझ्याशी विवाह करू शकत नाही." हे ऐकून तिला राग आला व तिने मुलाला भस्म करून टाकले. (पृ. २१६ एकादशसमुल्लास)

तसेच भागवत पुराणात विष्णुच्या नाभितून कमळ उत्पन्न झाले. कमळातून ब्रह्मा, ब्रह्माच्या उजव्या पायाच्या अंगठ्यापासून स्वायंभव आणि डाव्या अंगठ्यातून सत्यरूपाराणी, कपाळातून रुद्र आणि मरिची इत्यादिपासून दहा पुत्र, त्याच्यापासून दश प्रजापती, त्याच्या दहा मुलींचा विवाह कश्यपशी झाला... आदि काटेरी वृक्ष उत्पन्न झाले

(तेच पृष्ठ २३५)

"शिवपुराणात शिवाने इच्छा केली की एक सृष्टी आपण निर्माण करावी त्याने एक नारायण जलाशय निर्माण करून त्याच्या नाभीतून कमळ, कमळातून ब्रह्मा व पुढे शिवानेच जटेतून भस्म दिले व सृष्टी निर्मिण्याची आज्ञा दिली. (तेच पृष्ठ २३७)

बौद्ध धर्मानुसार सृष्टीनिर्माण

बौद्धमतात याचा उल्लेख सापडत नाही, पण 'बुद्धिज्म एंड इटस डेवलपमेंट' या पुस्तकात एडवर्ड कांजे लिहितात- "बौद्ध परंपरा सृष्टाच्या अस्तित्वाचा स्पष्टपणे अस्वीकार करीत नाहीत, पण त्यात विशेष रस ही दाखवित नाहीत. यासंबंधी कल्पना

करण्यात त्या वेळेचा अपव्यय मानतात. जीवांना मुक्ती मिळावी यासाठी सृष्टी आहे असे ते मानतात. सृष्टाबद्दल पूर्ण उपेक्षाभाव ठेवणारे बौद्धमत अनीश्वरवादी आहे.'' (पृ. ४१)

जैन धर्मानुसार सृष्टीनिर्माण

जैन धर्म भौतिकवादी आहे. जैन धर्म आणि परमात्मा या पुस्तकात म्हटले आहे, ''जगातील साऱ्या वस्तू आणि सारे बदल, परिस्थिती चांगली असो की वाईट, जिवाच्या राग, द्वेष, पदार्थाचे भेद आणि वैशिष्ट्यानुसार बनतात. यात परमात्म्याच्या हस्तक्षेपाची आवश्यकता नाही.'' (पृ.३८)

याच पुस्तकातील आणखी एक अवतरण पाहा- ''संसार वस्तुत: काय आहे? जीव जीवनमरणाच्या आगमनात अडकला आहे. कधी नरकात जातो तर कधी जड पदार्थ, वनस्पती, जनावर म्हणून जन्मतो. कधी मनुष्य कधी देवता कधी दानी, कधी दु:खी... हे जग प्रत्येक जीव आपल्या विचारानुसार आणि भावनेनुसार बनवितो, या प्रकारे संसाराचे कारण स्वत: जीव किंवा आत्मा आहे.'' (पृ.३७)

ख्रिस्ती मतानुसार सृष्टी

या संदर्भात बायबलमध्ये म्हटले आहे, ''ईश्वराने आधी आकाश आणि पृथ्वी बनविली. पृथ्वी वर खोल पाणी आणि अंधकार होता ईश्वर पाण्याखाली फिरत होता तो म्हणाला प्रकाश होवो आणि उजेड झाला. त्याने उजेडाला अंधारापासून वेगळे केले. रात्र, दिवस, संध्याकाळ, पहाट केली... सर्व सृष्टी निर्माण करून सातव्या दिवशी ईश्वराने विश्रांती घेतली.'' (बायबल जुना नियम उत्पत्ती १:१, ५:२, २:)

''कारण यहोनाने सहा दिवसात आकाश, पृथ्वी, समुद्र यांच्यात जे काही आहे ते निर्माण केले आणि सातव्या दिवशी विश्रांती घेतली.''

(बायबल, जुना नियम निर्गमन २०:११)

इस्लाम मताप्रमाणे सृष्टी निर्माण

अल्लाह सृष्टीचा एकमात्र निर्माता आहे. सृष्टीचा आरंभ त्याने पाण्याने केला. त्याच्या कार्यात इतर कोणी ही साहाय्यक नाही. कुरआनात म्हटले आहे,

''अल्लाहला सोडून तुम्ही जे पूज्य पुजता आहात. ते सर्व एकत्रित होऊन एक माशीदेखील निर्माण करू शकत नाहीत.'' (कुरआन २२:७३)

सृष्टी निर्माणाच्या कामाने ईश्वराला थकवा येत नाही, त्यासाठी त्याला विश्रांतीची गरज नाही. अशा सर्व बाबींपासून तो निर्लीप्त आहे. ईश्वर नेहमी होता आणि नेहमी राहणार आहे.

धर्मामध्ये मानवासाठी मार्गदर्शनाची व्यवस्था

बौद्ध मताला मानवासाठी पराभौतिक मार्गदर्शनाची गरज वाटत नाही. संन्याशाचे जीवन त्याला आदर्श वाटते. ईश्वर आणि त्याच्या मार्गदर्शनाला नकार दिल्याने जे शून्य निर्माण झाले ते गौतम बुद्धाची पूजा, आराधना याने भरण्याचा प्रयत्न केला जातो.

जैन मतात मानवाच्या मार्गदर्शनाची व्यवस्था ईश्वर किंवा पैगंबर, अवतरण यांच्या गरजेची आवश्यकता मानली जात नाही. जैन व बौद्ध दोन्ही धर्म मानवाच्या मुक्तीसाठी बुद्ध आणि महावीर यांच्या शिकवणुकीप्रमाणे आचरण करणे आवश्यक मानतात. या दोन्ही धर्मांच्या संस्थापकाची ईश्वराच्या ठिकाणी मानून पूजा-अर्चना प्रचलित आहे.

हिंदू धर्माचे आधार वेद, उपनिषद, महाभारत, गीता, पुराण इ. आहेत. मानवाच्या शिक्षणासाठी, मार्गदर्शनासाठी अवताराची कल्पना केली गेली आहे. ईश्वर स्वत: त्यासाठी मानवरूप किंवा दुसरे रूप धारण करून मानवाच्या मार्गदर्शनासाठी पृथ्वीवर येतो. भगवान विष्णुचे राम, कृष्ण, परशुराम हे अवतार मान्य केले गेले आहेत. नरसिंह, कासव, वराह, मासा इ. रूपे ही अवतार आहेत.

इस्लामी दृष्टिकोन

यानुसार मानवाच्या मार्गदर्शनासाठी ईश्वराने ईशदूतत्व (Prophethood) ची व्यवस्था केली आहे. ती पुढीलप्रमाणे-

१) मानवाचे शिक्षण आणि मार्गदर्शनाचे सर्व प्रकारचे ज्ञान ईश्वराजवळ आहे. तोच सृष्टा आहे त्यामुळे तोच मार्गदर्शन करू शकतो.

२) मानवाच्या शिक्षण व मार्गदर्शनासाठी ईश्वराने ज्या पवित्र आणि सच्चरित्र मानवांना त्याने निवडले त्यांना पैगंबर म्हटले गेले. मानवासाठी व्यावहारिक आदर्श एखादा मनुष्यच होऊ शकतो. पैगंबर वह्य म्हणजे अवतरणाद्वारे ईश्वराकडून संदेश प्राप्त करीत असत. ते हे ईश्वरप्रदत्त सत्य ज्ञानाच्या आधारे जे सांगत ते प्रामाणिक आणि अंतिम होते. म्हणून पैगंबरांवर श्रद्धा ठेवणे आणि त्यांचे आज्ञापालन करणे त्यांच्या अनुयायांसाठी अत्यंत कल्याणकारी होते. ईश्वराने हे पैगंबर निवडलेले असल्याने त्यांना नाकारणे, ईश्वराला नाकारण्यासारखे आहे.

३) हे पैगंबर विभिन्न कालखंडात आणि विभिन्न जातींसाठी येत. अंतिम पैगंबर मुहम्मद (स.) झाले. त्यांच्यावर श्रद्धा ठेवणे आवश्यक आहे. त्यांच्या आधीच्या पैगंबरांच्या शिकवणुकी आणि त्यांच्यावर अवतरलेल्या ग्रंथात इतके फेरबदल झाले आहेत की मूळ शिकवणुकीचा पत्ता लावणे कठीण आहे.

आज मुहम्मद (स.) यांची शिकवण, जीवनचरित्र, संदेश इ. इतिहासात सुरक्षित आहेत. आधीच्या पैगंबरांच्या उपदेशाचे सार त्यात सुरक्षित आहे. म्हणून मुहम्मद (स.) यांच्या मार्गदर्शनाला नकार देऊन कोणी मनुष्य भटकण्यापासून मार्गभ्रष्ट होण्यापासून कसा काय वाचू शकतो?

४) जरी मनुष्यात बुद्धी आणि चेतना असली तरी तो स्वत: बरे-वाईट, पाप-पुण्य यातील फरक ओळखून स्वत:ला योग्य मार्ग दाखविणे अशक्य आहे. म्हणून ईश्वराने त्याच्या मार्गदर्शनासाठी नबी आणि पैगंबरांची एक लांबलचक परंपरा सुरू ठेवली.

मृत्यूनंतरच्या जीवनाची कल्पना आणि विविध धर्म

हिंदू धर्म, बौद्ध मत, जैन धर्म, शिख मत, यांच्यात मृत्यूनंतरच्या जीवनाबद्दल आवागमन (Transmigration) ची कल्पना समान आहे. वेदांमध्ये आवागमनची कल्पना नाही तेथे कर्माप्रमाणे पारलौकिक जीवनात स्वर्ग, नरक कल्पना आहे. परंतु पुराण आणि इतर हिंदू धर्मग्रंथात आवागमनाच्या (पुनर्जन्म) उल्लेख आढळतो म्हणजे मृत्यूनंतर कर्माच्या आधारावर मनुष्याला पुन: इहलोकात जन्म मिळतो.

मनुष्याचा नवा जन्म पुन्हा मनुष्य, जनावर, कीडा-कीटक, गवत, वनस्पती या रूपात मिळतो. जन्म-मृत्यूचा क्रम त्याला ८४ लाख योनी शरीरातून गेल्यानंतर त्याला मुक्ती मिळते त्या मुक्तीबद्दलही हिंदू धर्मात मतमतांतरे आहेत.

ख्रिस्ती धर्मात मृत्यूनंतर जीवनाची कल्पना आहे. मुक्तीसाठी संसारिक जीवनात येशूला ईश्वराचा पुत्र मानून येशूला क्रूसावर प्राण देण्याची गोष्ट मानून त्यावर अशी श्रद्धा ठेवावी लागते. त्या धर्मानुसार जीवनासाठी विशिष्ट रीत नाही. पण जीव स्वर्ग-नरकाची कल्पना मात्र आहे.

इस्लाममध्ये मृत्यूनंतरच्या जीवनाविषयी स्पष्ट शिकवणूक मिळते. या परलोक कल्पनेनुसार मनुष्याला आपल्या सांसारिक जीवनाबद्दल अल्लाहसमोर जाब विचारला जाईल.

एकेश्वरत्वावर विश्वास आणि चांगल्या कर्माच्या आधारे त्याला स्वर्ग आणि वाईट कर्माच्या आधारे त्याला यातना दिल्या जातील. यासाठी कोणाचीही शिफारस चालणार नाही. ईश्वराचा न्याय निष्पक्ष असेल. कयामत (महाप्रलया) नंतर सर्व मानवांना अल्लाहसमोर हजर राहून उपरोक्त परिस्थितीचा सामना करावा लागेल.

कुरआन मध्ये म्हटले आहे,

"कयामतच्या दिवशी तो (अल्लाह) तुम्हा सर्वांना जरुर एकत्र करतो हे निसंदिग्ध सत्य आहे. परंतु ज्या लोकांनी स्वत:ला सर्वनाशाच्या संकटात लोटले आहे.

ते हे मानत नाहीत.'' (कुरआन, ८:१२)

"त्या लोकांचे नुकसान होईल ज्यांनी अल्लाहशी त्यांच्या भेटीला खोटे ठरविले आहे. जेव्हा अचानक तो प्रसंग समोर येईल तेव्हा हेच लोक म्हणतील. अरेरे, या गोष्टीकडे आम्ही दुर्लक्ष केले. ते आपल्या पापांचे ओझे पाठीवर लादेलेल्या स्थितीत असतील. त्यांची परिस्थिती अत्यंत वाईट असेल. जगातील जीवन काय एक खेळ, तमाशा असेल. परलोकाबद्दल भय ठेऊन जे वागतील त्यांना तेथे चांगले जीवन मिळेल. तुम्हाला बुद्धीने विचार करता येत नाही का?'' (कुरआन, ८:३१,३२)

मृत्यूनंतर माणसाला पुन्हा जिवंत करण्याबाबत कुरआन म्हणतो,

"त्याच्या खुणेबाबत म्हणशील तर तू जमिनीकडे पहा ती ओसाड आहे. मी पाऊस पाडला ती भिजली मग बहरली. जमीन जशी जिवंत झाली तसेच मी मृतांनादेखील जिवंत करेन निश्चितच त्याला हे सामर्थ्य प्राप्त आहे.''

(कुरआन, ४१:३९)

परलोकात काय घडेल हेदेखील कुरआनात विस्ताराने सांगितले गेले आहे. एके ठिकाणी उल्लेख सापडतो,

"आणि प्रत्येक व्यक्तीला तिच्या कमाईचा बदला मिळेल, आणि त्याच्यावर काहीही अत्याचार होणार नाही.'' (कुरआन, २:४८)

"कयामतच्या दिवशी तुमची संतान किंवा नातेवाईक काहीही तुमचे भले करू शकणार नाही. अल्लाह तुमचा न्याय करेल. तुम्ही जे काही करता ते तो पाहतो.''

(कुरआन, ६०:३)

"त्या दिवशी मनुष्य आपले भाऊ, आई-बाप, पत्नी, आपली मुले यांच्यापासून दूर पळेल. प्रत्येक व्यक्तीवर प्रसंग असा ओढवेल की स्वत:शिवाय त्याला काहीच सुचणार नाही.'' (कुरआन ८०:३४-३७)

उपरोक्त विवेचनावरून पुढील निष्कष समोर येतात-

१) धर्मा धर्मात त्यांच्या मूळ कल्पनांमध्ये गंभीर मतभेद आहेत.

२) या सर्व कल्पना एकाच वेळी सत्य आणि बरोबर असू शकत नाहीत. यातील जी खरी असेल तिचा शोध घेतला पाहिजे.

३) कारण या धारणांचा मनुष्याच्या व्यावहारिक जीवनाशी ईश्वर आणि भक्ताच्या अधिकाराशी महत्त्वाचा संबंध आहे. लोकांनी यथार्थ भावनेला स्वीकारले नाही ते जीवनात असफल होतात.

४) मनुष्य जीवनाच्या उद्देशाचा दृष्टिकोन, उपासनेबाबतचा दृष्टिकोन, मानव समानता

बद्दलचा दृष्टिकोन इ.बाबत विविध संप्रदायामध्ये मतभेद आढळतात.

उपरोक्त अध्ययनानंतर एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे या धारणांमध्ये कोणती कल्पना/धारणा ईश्वरप्रदत्त आहे जी स्वीकारून अनुयायी ईश्वराला खूश करू शकतील? या तथ्याचा शोध ज्ञान, तर्क बुद्धी यांच्या आधारे घेणे हे प्रत्येक मनुष्याचे कर्तव्य आहे.

कुरआन चे मार्गदर्शन

कुरआन १४५० वर्षांपूर्वी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर अवतरला. पैगंबर मुहम्मद (स.) कुरआनचे लेखक नाहीत. कुरआन सुरूवातीपासून शेवटपर्यंत म्हणतो की अल्लाहने तो अवतरित केला, कुरआनात आव्हान दिले गेले आहे की जे लोक त्याला अल्लाहची वाणी मानत नाहीत. त्यांचे पुस्तक मानत नाहीत, त्यांनी अशा प्रकारची एक आयत (ओळ) बनवून दाखवावे.

कुरआनात एक विशेष गोष्ट सांगितली गेलीय की, या आधीचे जे ग्रंथ अल्लाहकडून अवतरित केले गेले त्यापैकी एकही सुरक्षित राहिले नाहीत. आपल्या स्वार्थासाठी त्यांच्या अनुयायांनी आपल्या मनाप्रमाणे त्यात बदल, घट, वाढ केलीय. त्यामुळे मूळ शिकवणूक माहीत होत नाही. कुरआन एकमात्र असा ग्रंथ आहे जो आपल्या मूळ रूपात सुरक्षित आहे. शिवाय आधीच्या ग्रंथाचे सार यात आहे. त्यामुळे त्यांचे ही शुद्ध स्वरूप पारखून घेण्याची ती कसोटा/मापदंड आहे.

सत्य धारणा आणि धर्माचा शोध या विषयावर मानवजातीचे मार्गदर्शन कुरआन कसे करतो याविषयी पुढील आयतीचा विचार महत्त्वाचा ठरतो.

"दीन (धर्म) तर अल्लाहचा दृष्टीने केवळ इस्लाम आहे." (कुरआन, ३:१९)

"हे लोक काय अल्लाहच्या आज्ञापालनावा मार्ग सोडून दुसरी पद्धत स्वीकारणार आहेत? खरे तर पृथ्वी आणि आकाशातील सर्व वस्तू इच्छेने-अनिच्छेने ईश्वराच्या अधीन, आज्ञेत आहेत आणि त्याच्याकडेच सर्वांना परत जायचे आहे."

(कुरआन, ३:४३)

"इस्लामव्यतिरिक्त अन्य पद्धत कोणी स्वीकारली तर त्याचा स्वीकार केला जाणार नाही. परलोकात तो अयशस्वी होईल." (कुरआन, ३:८५)

"आज मी तुझ्यासाठी धर्म पूर्ण केला आणि तुझ्यावर अनुग्रह केला आणि तुझ्यासाठी इस्लामला तुझ्या धर्माच्या रूपात स्वीकारले आहे." (कुरआन ५:३)

कुरआन आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या कथनातून स्पष्ट होते की माणसासाठी इस्लाम हा अल्लाहने दिलेला धर्म आहे. त्यांचा संस्थापक कोणी व्यक्ती, ईशदूत, नबी नाही. पैगंबर आदम (अ.) आणि त्यांच्या संततीला पहिल्या दिवसापासून

हा धर्म प्रदान केला.

अल्लाहचे पूर्ण आज्ञापालन आणि त्याची भक्ती करणाऱ्याला 'मुस्लिम' म्हणतात. इस्लाम धर्म संपूर्ण मानवजातीसाठी सार्वकालिक आणि शाश्वत धर्म आहे.

इस्लामच्या विरुद्धची जी जीवनशैली आहे ती सत्याचा अस्वीकार करणारी आणि बहुदेववादावर आधारित आहे. कुफ्र म्हणजे सत्याला नकार देणाऱ्या कुरआनच्या आयत पाहू या,

"विश्वास ठेवा, ज्या लोकांनी कुफ्र केला आणि त्या स्थितीत त्यांचा मृत्यू झाला तर त्यांच्यातील कोणी परीक्षा चुकविण्यासाठी पृथ्वी एवढे सोने दिले तरी स्वीकारले जाणार नाही. अशा लोकांसाठी यातना देणारी शिक्षा आहे. त्याला कोणीही मदत करणारा मिळणार नाही." (कुरआन, ३:९१)

"ज्या लोकांनी कुफ्रचा मार्ग स्वीकारला आहे त्याच्यासाठी सांसारिक जीवन प्रिय आणि मनपसंत बनविले गेले आहे. असे लोक श्रद्धावान लोकांची चेष्टा करतात पण कयामतच्या दिवशी संयमी लोक त्यांच्यापेक्षा उच्च स्थानावर असतात. आणि सांसारिक आजीविका तर अल्लाहला अधिकार आहे की त्याला वाटेल त्या व्यक्तीस तो अमर्याद आजीविका देऊ शकतो." (कुरआन २: २१२)

निर्णय मनुष्याच्या हाती

कुरआनच्या दृष्टीने मनुष्यासाठी इस्लामच योग्य धर्म आहे. अल्लाहने मानवाला खूप धर्म दिले नाहीत. त्याने असे म्हटले नाही की तुम्ही कोणत्याही धर्माने वागा मी खूश होईन. जगातील उन्नती, सुख परलोकातील साफल्य, मुक्ती इ. त्यांना एकाच धर्मात मिळेल. ज्याला ईश्वराचे अनुमोदन मिळालेले असेल. पण तोच धर्म स्वीकारण्यासाठी मनुष्यावर जोर जबरदस्ती करता येत नाही. या संदर्भात कुरआनात म्हटले आहे-

"धर्माच्या बाबतीत कोणतीच जबरदस्ती नाही." (कुरआन, २:२५६)

"हे पैगंबर तुम्ही सांगा, तुमच्या रबकडून हेच सत्य आहे की ज्याला आवडेल त्याने मानावे किंवा अस्वीकार करावा." (कुरआन १५:२९)

"आम्ही त्याला मार्ग दाखविला, मग तो कृतज्ञ बनू दे किंवा नकार देणारा." (कुरआन)

उपरोक्त विवेचनातून स्पष्ट दिसतेय की कुरआन इस्लाम ला ईश्वराचा धर्म म्हणतो पण त्याचा स्वीकार आणि नकार याचा अधिकार पूर्णतः व्यक्तीला दिला आहे.

"सुरूवातीला सर्व लोक एकाच पद्धतीने राहात. नंतर ही स्थिती राहिली नाही

आणि अनेक भेद झाले. अल्लाहने पैगंबर पाठविले. सरळमार्गाने जाऊन आनंद मिळवण्याविषयी व वाकड्या मार्गाने जाऊन परिणामाला घाबरवणारे होते ते! पैगंबरांबरोबर सत्यावर आधारित ग्रंथ अवतरविला. लोकांना सुरवातीला सत्याचे ज्ञान दिले होते. हे स्पष्ट आदेश मिळूनसुद्धा त्यांनी सत्याला सोडले आणि विभिन्न मार्ग स्वीकारले. पैगंबरांना ज्यांनी अनुसरले अल्लाहने त्यांना सत्य मार्ग दाखविला. अल्लाह ज्याला इच्छितो त्याला सरळमार्ग दाखवितो.'' (कुरआन, २:२१३)

-०- समाप्त -०-